# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ३१/०७/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ३१/०७/२००६ रोजी सभा सुचना क्र. १० दि. २६/०७/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १०) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ११) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १२) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १४) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १६) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या या सभेकरिता सर्व उपस्थित असलेले सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या या सभेच्या कामकाजाला सचिवांनी सुरुवात करावी.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६४ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, गेल्या सभेमध्ये जो हॉटेलबद्दलचा विषय आलेला आहे. वर्सोवा ब्रीजच्या बाबत....

**केशव घरत :-**

सभापती महोदय, गेल्या सभेमध्ये जे दोन अनधिकृत बांधकामाबाबत मागणी केली होती, वर्सोवा ब्रीजच्या पाठीमागे त्याचे बांधकाम सुरु आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते हॉटेल तोडले होते त्याचे बांधकाम पुन्हा चालू करण्यात आलेले आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी, प्रेमनाथ पाटीलजी मी सभापतींच्या परवानगीने बोलू इच्छितो की, आपल्या आढाव्यामध्ये अतिक्रमणमध्ये किती पैसे ॲप्रीशिएट ठेवलेले आहेत. अतिक्रमण तोडायला गेल्यावर किती खर्च केला आणि खर्च आला.

**सुर्यकांत भोईर :-**

काल दिले असते तर आम्ही वाचले असते. हे आता दिले आहे. त्यामुळे आम्ही त्याचा आढावा काय घेणार आहोत.

**मोहन पाटील :-**

या आढाव्यावरुन आपल्याला मिळेल ना. म्हणजे तुम्ही किती बांधकामे तोडली आणि तोडायला किती खर्च केला. म्हणजे तुमची किती इन्क्रीमेंट झाली? त्यावरुन तुमच्या लक्षात येईल ना.

**सुर्यकांत भोईर :-**

ठिक आहे.

**केशव घरत :-**

साहेब, त्यांनी परमिशन घेतली आहे व परवानगी आहे का नाही. त्याची देखील आम्हाला माहिती व्हायला पाहिजे ना.

**मोहन पाटील :-**

त्याचा खुलासा झाला ना. अतिक्रमणचा खर्च सांगणार आहेत ना.

**केशव घरत :-**

अतिक्रमणवाले येथे दिसत नाही. सभापती महोदय, मी ज्या दोन बांधकामा संदर्भात मागणी केली होती त्याचे काय झाले? त्या हॉटेलच्यासमोर बांधकाम सुरु आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपण हा विषय पेन्डींग ठेवू या. सध्या अधिकारी नाही.

**केशव घरत :-**

आता सध्या अधिकारी उपलब्ध नाहीत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

आपण हा विषय शेवटी घेउ या.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण गेल्या सभेत सांगितले होते की, सर्व अधिकारी सभेला येतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गेल्या सभेमध्ये खतगांवकर साहेबांनी कमिटमेंट केले होते की, मी पुढच्या मिटींग या सगळ्या अनधिकृत बांधकामाचा आढावा घेईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

आता ज्या विषयाचे आपल्याकडे वाचन आले आणि मा. सभापती साहेबांनी निर्देश दिलेले आहेत. अतिक्रमणाबाबत आपण शेवटी चर्चा करु. दरम्यानच्या काळात दुस-या विषयावर चर्चा करायला हरकत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

अनधिकृत बांधकामे किती चालू आहेत त्याचा आढावा आम्हाला देण्यात यावा.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, आपल्याला जवळ जवळ एक वर्ष पूर्ण होत आले आहे. ही जी पद्धत आहे, या पद्धतीला खतगांवकर साहेब आपण कुठेतरी आळा घाला. आता हे तुम्ही आमच्या हातामध्ये दिलेले आहे आणि बजेटच्या सगळ्या प्रती घरी राहीलेल्या आहेत. या घडीला तुम्ही हे कागद आमच्या हातात दिल्या आणि आम्ही आता अभ्यास काय करणार आहे तर काही नाही. आम्ही बोलू नये म्हणून आपण हे आता दिलेला आहे. जेव्हा तुम्ही अजेन्डा पाठवता त्याचवेळी हे तुमच्याकडे तयार असते ते आपण आम्हाला दिले असते तर आम्हाला त्याच्यावर काहीतरी अभ्यास करता आला असता की, नाही.

**मा. सभापती :-**

हे किती वेळा सांगण्यात आलेले आहे.

**मिलन पाटील :-**

आम्ही तुम्हाला हे नेहमी सांगत आलेलो आहोत. विषयाचा जो गोषवारा असतो तो तुम्ही आम्हाला येथे बसल्यावर देता. सचिव साहेब, तुमची ही पद्धत बरोबर नाही. ह्यावेळी आम्ही तुम्हाला क्षम्य करु शकतो कारण तुमची तब्येत बरोबर नव्हती. आमचा हा शेवटचा दिवस आहे. पण ह्यानंतर देखील आपण असे करु नका. नगरसेवक आहेत त्यांना अभ्यास करायला पाहिजे की, नको. अभ्यास केला तरच त्या अधिका-याला प्रश्न विचारु शकतील ना. आपण आम्हाला हे असेच द्याल आणि आमची तोंड आपण बंद कराल ह्याच्यावर काहीच नाही. आम्ही वेडीवाकडे उत्तर देणार ते तिथे टाईप होणार. हे बरोबर नाही ना. अभ्यास करून बोलणे आणि असेच बोलणे. आपण कोणावर आरोप करताना आपल्याकडे काहीतरी पुरावे पाहिजेत ना. ह्याच्यामध्ये आम्ही आपल्याला काय सांगणार. आमच्या बजेटच्या कॉप्या घरी राहिलेल्या आहेत. आता अ,ब,क,ड मध्ये काय आहे आणि काही नाही हे आम्हाला कसे समजणार?

**प्रभात पाटील :-**

आम्ही बोलणार कसे? बजेटची कॉपी घरी आहे.

**मिलन पाटील :-**

बजेटची कॉपी घरी राहीली आहे आणि तुम्ही आम्हाला हे आज दिले. जर अगोदर दिले असते तर ह्याच्याबद्दल आम्ही विचारले असते ना.

**प्रभात पाटील :-**

कसे बोलणार, काय बोलणार?

**मिलन पाटील :-**

म्हणजे न बोलण्याकरिता आपण हे आमच्या तोंडावर मारले आहे की, काय? हे त्रैमासिक आहे. त्याला आम्ही काय करु शकत तर नाही आणि त्यांनी वसुली काहीही केलेली नाही. तर आम्ही त्यांचे कोणाचे काय करणार?

**सुर्यकांत भोईर :-**

बजेटची सभा झालेली होती त्यावेळी त्याच्यावर आपण चर्चा केली होती की, जे अधिकारी वसुली करत नाही त्यांच्यावर ठोस कार्यवाही केली जाईल. उपायुक्त साहेब, म्हणजे आपले अधिकारी वसुली करण्यामध्ये सक्षम नाही.

**मिलन पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण जेव्हा हे बजेट ठरवले होते त्यावेळी असे नक्की केले होते की, ह्याबाबतीमध्ये जे वसुली करणार नाही त्यांचे आपण इनक्रीमेंट थांबवणार आहोत की, काय करणार आहात? त्याच्यावर उपाय काय करणार आहात? हे आपण अगोदर नक्की करा तरच ह्याच्यावर पुढे जाउन कायतरी फायदा आहे. नाहीतर, आपण असेच काय करायचे आणि आपले अधिकारी ही काही बोलणार नाहीत, काय नाही. तुम्ही पण काय बोलणार नाहीत आणि निघून जाणार आहात. पुढचे येणाऱ्या लोकांचे काय फ्युचर आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, घरपट्टी....

**जयंत पाटील :-**

आज तीन महिन्यामध्ये जर तुमचे १ करोड ४९७ लाख जमा होत असतील.

**गजानन भोईर :-**

आपण अजून पर्यंत त्या लोकांना घरपट्टी डिमान्ड केलेली नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

गेल्यावर्षी किती वसुली झालेली आहे.

**गजानन भोईर :-**

त्यांना डिमान्ड बिल गेलेली नाही.

**मिलन पाटील :-**

आपण हे असे केले तर बजेटचा काय अर्थ नाही ना. मग हे बजेट कशाकरिता बनवायचे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) सो.) :-**

त्रैमासिक अहवालाच्या अनुषंगाने आपल्याला कल्पना यावी, हे डॉक्युमेंट ओपन डॉक्युमेंट आहेत. यामध्ये कुठल्याही प्रकारचे सिक्रेसी काही नाही. प्रत्येक व्यवहार हे ऑथोराईज बँक आणि बुकींग अशापद्धतीने केले जातात. त्यामुळे एखादी रक्कम जमा आणि खर्च न कळण्याचे किंवा लपवून ठेवण्याचा असा काहीच उद्देश नाही. वस्तुस्थिती आपल्या लक्षात येण्यासाठी या सोबत एक संक्षिप्त टिपणी मुख्यलेखाधिकारी ह्यांनी दिलेली आहे. यामध्ये दि. १/४/२००६ ते ३०/६/२००६ पर्यंतचे अर्थसंकल्पीय तरतुद काय होती आणि त्रैमासिक तरतुद काय होती आणि प्रत्यक्ष जमा किती झाली व उर्वरित शिल्लक किती आहे? हे समजण्यासारखे म्हणजे संक्षिप्तपणे सोळा मुद्याचा गोषवारा दिलेला आहे. आपण त्याप्रमाणे गेलात आणि त्याच्यावर चर्चा केली तर आपल्याला कोणतीही अडचण येणार नाही. त्या अनुषंगाने चर्चा व्हायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक एक मुद्द्यावर चर्चा करावी.

**सुर्यकांत भोईर :-**

लाईनने विषय घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पहिल्यांदा घरपट्टीच्या विषयावर बोला.

**सुर्यकांत भोईर :-**

लाईनने बोला. पहिल्यांदा घरपट्टीचा विषय घ्या.

**मिलन पाटील :-**

साहेब, लेखापरिक्षकांची देखील ह्याबाबतीत त्यांची जबाबदारी आहे. समजा, त्यांच्याकडे जर हा तक्ता दिलेला होता तर त्यांनी ह्याबाबतीत त्यांच्यावर काय कार्यवाही केलेली आहे? त्यांना लेटर वगैरे पाठवले आहे का? त्यांची वसुली काय झालेली नाही. आपण जो इष्टांक दिला होता तो इष्टांक पुर्ण झाला किंवा नाही. तर ह्याबाबतीत त्यांनी डिपार्टमेंटला काय कळवले की नाही. जर समजा, घरपट्टीच्या बाबतीत आहे व घरपट्टीच्या बाबतीत तुमची एवढी वसुली व्हायला पाहिजे होती ती तुमची वसुली झालेली नाही ह्याचे कारण काय आहे? असे त्यांनी लेखापरिक्षकाकडे काय दिलेले आहे का नाही हे त्यांनी सांगावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

सदर संस्थेचे काम करताना मी माझा एक अनुभव सांगतो, आपण वर्षाची जी अर्थसंकल्पीय तरतुद करतो. त्याची इन्स्टॉलमेंट आपण क्वॉटरली करतो. साधारणतः समजा, वर्षामध्ये जर चार क्वॉटर येत असतील तर पहिले दोन क्वॉटर हे डिपीशिएटच असते. प्रशासकीय प्लानिंग त्या काळामध्ये असतो. वास्तविक हे मार्च जून महिन्यामध्ये व्हायला पाहिजे. पण मागचे एरियर्स वसुलीचे काम, काही इतर डिमान्ड लिहिण्याचे काम या अनुषंगाने पहिला क्वॉटर हा डिपीशिएट असतो. त्याप्रमाणे याठिकाणी ॲक्च्युअल ज्या जमा रक्कमा झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने मला वाटते चर्चा व्हायला पाहिजे आणि ज्याठिकाणी हा डिपीशिएट आहे त्याची कारणे ह्या विभागाकडून घेउन त्याच्यावर चर्चा करायला पाहिजे. पर्स त्याच्यावर कारवाई करू शकतो पण सिस्टम जर इमप्रूव्ह करायचे असेल तर आपण त्याला सुझाव द्यायला पाहिजे. त्याला एखादा व्यक्ती दोषी आहे असे म्हणता येणार नाही.

**मिलन पाटील :-**

त्यांचा अधिकार त्यांनी वापरला आहे की, नाही तेवढेच विचारायचे आहे. लेखापरिक्षकाची जबाबदारी आहे का नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, लेखापरिक्षक नाही तर उपायुक्त हे करणार ना.

**मिलन पाटील :-**

उपायुक्तांची जबाबदारी नाही. ही जबाबदारी लेखापरिक्षकाची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

लेखापरिक्षक नाही करणार.

**मिलन पाटील :-**

श्री. नाकाडी साहेबांची बिल आहेत. त्यांच्याकडे अहवाल यायला पाहिजे. तुम्ही वसुली केल्यानंतर त्यांच्याकडे त्यांनी जमा करायला पाहिजे. कदाचित मी चुकीचे बोलत असेल तर उपायुक्तांनी सांगावे की, त्यांची जबाबदारी काय आहे? आपण जे इष्टांक देती हे त्यांच्याकडे पहिले येते आणि वसुलीचे आले की, पहिल्या अहवाल त्यांच्याकडे जातो. त्यांनी अहवालामध्ये त्यांच्यावरच सर्व लादलेले आहे. कारण डिपार्टमेंट वसुली होते की, नाही त्यांच्यानंतर ते त्यांना विचारतील की, तुमच्याकडून हे का झाले नाही. नाकाडी साहेब हे बरोबर आहे ना, का मी चुकीचे काय बोलतो?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

पहिला मुद्दा, हे जे लेखे ह्या ठिकाणी सबमिट केलेले आहेत. ह्याचे आपण अवलोकन केल्याचे आम्ही खात्री करायची का? म्हणजे जी वस्तुस्थिती फिजीकल....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पहिल्यांदा घरपट्टीचा मुद्दा घ्या.

**मिलन पाटील :-**

मी जे बोललो त्याचा काय उपयोगच नाही का? तुमच्याकडे त्याचे उत्तर नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

मी तुम्हाला तुमच्या उत्तराचा खुलासा केला की, व्यक्ती म्हणून तिथे ॲनेलेसिस करता येत नाही. पर्सनल फॉल्ट....

**मिलन पाटील :-**

व्यक्ती म्हणून बोलत नाही. त्यांचे डिपार्टमेंट आम्ही बोलत आहोत. व्यक्तीशी आमचे काही घेणं-देणं नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

कोणत्या बाबतीत ते डिपार्टमेंट कमी पडले असे आपल्याला वाटते.

**मिलन पाटील :-**

समजा, टॅक्सचे उदाहरण घ्या. टॅक्सची वसुली कमी आहे. त्यांनी टॅक्स डिपार्टमेंटला काय लेटर दिलेले आहे का? की तुमची एवढी वसुली कमी आहे का, तुमच्यावर का कार्यवाही करु नये? तुमची अडचण काय आहे? असो त्यांचा अहवाल त्या डिपार्टमेंटला गेला आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

मुख्यलेखापरिक्षक हे डायरेक्ट त्या डिपार्टमेंटला असे पत्र लिहू शकत नाही. आयुक्तांना लिहितात आणि आयुक्त साहेब त्याच्यावर निर्णय घेतात.

**मिलन पाटील :-**

तुमच्या थ्रू जरी झाले तरी चालेल. त्यांचे म्हणणे काय, त्यांनी काय दिले आहे का नाही किंवा ह्याबाबतीत त्यांनी काहीच केलेले नाही. कार्यवाही कोणी करायची हे तुम्हाला कोणी सांगितल्यावर तुम्हाला कळेल की, नाही. लेखापरिक्षकाने तुम्हाला सांगितले की, ह्याच्यामध्ये एवढ्या त्रुटी आहेत, एवढी वसुली कमी आहे. त्याच्यानंतर तुम्ही कार्यवाही करु शकाल की नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, आपल्याला मी आश्वासित केलेले आहे की, पहिल्या क्वॉटरमध्ये आपला नो वर्कींग प्राब्लेम आहे, सिस्टमचे प्राब्लेम आहेत. त्यामुळे अपेक्षित उत्पन्न नाही. इट इज फॅक्ट.

**मिलन पाटील :-**

असू दे ना. पण आम्ही कुठे जायचे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

त्याला चालना देण्यासाठी आपले चांगले जे सुझाव असतील ते आपण द्या आणि कार्यवाहीचा मुद्दा कुठे येतो जर कोणी पर्सनल अफरातफर केली, पर्सनल लायबिलीटीझ पाळल्या नाहीत तर त्याच्यावर आपण कार्यवाही करतो. पण आता आपल्या सिस्टमची काही प्रॉब्लेम्स आहेत. आम्ही आमच्या अडचणी आपल्यासमोर मांडू की, काय परिस्थिती असते. पहिल्या क्वॉटरमध्ये रक्कमा जमा होण्याच्या.

**मिलन पाटील :-**

साहेब, आम्ही जबाबदारीचे तुम्हाला विचारतो. जबाबदारी ही जी डिपार्टमेंटमध्ये जसे करते, ते एक हेड आहेत मुख्य आहेत. आपल्या संबंध बजेटचे मुख्य ते आहेत. म्हणून त्याच्याकरिता विचारतो. त्यांनी आपल्याला काही गाईड लाईन्स दिल्या का? की, एवढी वसुली जमा आहे. आपण माझ्या प्रश्नाचे मला उत्तर देत नाही. मी तुमच्याकडे डायरेक्ट उत्तर मागतोय तुम्ही त्याला बगल देता. असे नाही. मला त्याचे उत्तर द्या. म्हणजे त्यांनी टॅक्स डिपार्टमेंटला कळवले की नाही, तुम्हाला कळवले की नाही? आम्हाला हे त्यांच्याकडून पाहिजे. म्हणजे उद्या जर वसुली झाली नाही तर आम्ही कोणाला पकडायचे? म्हणजे त्या डिपार्टमेंटचे जे हेड असतील त्यांना डायरेक्ट पकडायचे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

ज्याच्यावर रिसपॉन्सीबिलिटी आहे. ज्याने काम केले नाही त्याला आपणाला रिसपॉन्सीबल करावेच लागणार.

**मिलन पाटील :-**

मग लेखापरिक्षकाचे काम काय?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांच्याकडे आलेल्या फाईल्स बरोबर आहेत की, चुकीचे आहेत त्याच्यातून मार्ग काढणे.

**मिलन पाटील :-**

लेखापरिक्षकाचे काम काय? त्यांची वसुली झाली आहे का नाही? आपल्या महानगरपालिकेकरिता त्यांनी ते बघायचे असते. आपली वसुली झाली आहे का नाही? हा मेन मुद्दा त्यांचा आहे. वसुलीवर त्यांनी जास्तीत जास्त भर दिला पाहिजे. आपण त्यांना कशाला नेमले आहे. वसुलीवर त्यांनी जास्तीत जास्त भर दिला पाहिजे आणि प्रत्येक वेळी त्यांनी तुम्हाला कळवायला पाहिजे. हे असे असे आहे. नाहीतर महानगरपालिका तोट्यामध्ये येईल. महानगरपालिकेची ही वसुली आहे. महानगरपालिकेची देणी जातील किंवा देण आपल्याजवळ राहिल. कारण ही वसुली होत नाही. त्याचा असा हा तगादा प्रत्येक डिपार्टमेंटवर पाहिजे आणि अंश त्यांचा प्रत्येक डिपार्टमेंटवर असतो. म्हणून त्यांनी तुम्हाला वेळोवेळी कळवले पाहिजे. आम्ही तुम्हाला तेच विचारतोय की, त्यांनी काय कळवले की नाही. त्यांनी जर कळवले नाही तर खालचे डिपार्टमेंट ही शांत बसणार. त्यांना काय करायचे आहे? फाईली पाठवलेल्या आहेत, येतील किंवा नाही. आमचा उद्देश असा की, वसुलीच्या बजेटबाबत त्यांनी ठोस कार्यवाही काय केलेली आहे? तीन महिने तुम्ही सांगता होउ शकते. ठिक आहे. पण पुढच्या ह्याच्यात तरी....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

त्यामध्ये अजून एक खुलासा करतो. घरपट्टीच्या अनुषंगाने....

**मिलन पाटील :-**

घरपट्टीचे नाही.

**जयंत पाटील :-**

सर्वच बाबतीत असे दिसते की, फक्त एकच सोडून पाण्याची नविन नळ जोडणी शुल्क हे आपणांस जास्त आलेले आहे. पंधरा लाख रूपये जास्त आलेले आहे. ते त्यांचे पंधरा लाख रुपये परत करा आणि इतर ठिकाणी ह्या खुर्च्या का नाही? काय कमतरता आहे आपल्यामध्ये? त्यांच्याकडे तेवढा स्टाफ नाही का? आपण एवढी भरती करत आहोत.

**मिलन पाटील :-**

चेअरमन साहेब, आपण नाकाडी साहेबांना विचारा की, ह्याच्याबाबत तुम्ही काय केले आहे का? ते सांगतिल ना, आम्ही कोणालाही कोणत्याही प्रकारचे पत्र दिलेले नाही. संपले. आम्ही मग पुढे एकेकाला विचारतो. आपण सांगा. त्यांनी त्यांची ड्युटी बजावली आहे का, नाही ते आम्हाला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

त्रैमासिक तरतुद जी आहे त्याच्यापैकी आपल्याला खूप कमी उत्पन्न आलेले आहे. तरतुदीपेक्षा खूप कमी. म्हणजे बाकीच्या नउ महिन्यामध्ये रक्कम कशी गोळा होणार? म्हणजे आपला अंदाज कुठेतरी बारगळला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

वसुली करायची आहे ती सत्तर ते ऐंशी टक्के. पण हवी तशी वसुली होत नाही.

**जयंत पाटील :-**

पण आमचे डिपार्टमेंट कुठे कमी पडते?

**सुर्यकांत भोईर :-**

पण टॅक्स डिपार्टमेंटची वसुली बरोबर होतच नाही. त्यांना कुठे कमतरता होत असेल तर त्यांनी ते आमच्या समोर आणावे ते आम्ही मान्य करु.

**मिलन पाटील :-**

उपायुक्त साहेब, संबंधित विभागाला त्यांची काय अडचण असेल ते सांगू दे आम्ही ती अडचण दूर करु. पण मेन गोष्ट म्हणजे त्यांनी अडचण सांगायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) सो.) :-**

मुख्य वसुलीचे आपल्याजवळ तीन भाग आहेत. जकात, पाणी पट्टी आणि घरपट्टी. जकात आपण ठेक्याने दिलेली आहे. त्यांचा कोणताही हफ्ता....

**जयंत पाटील :-**

जकातमध्ये बॅलेन्स काय दाखवत आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) सो.) :-**

जकातमध्ये कोणताही हफ्ता प्रलंबित नाही.

**जयंत पाटील :-**

शिल्लक, तुमची बाकी एवढी एवढी शिल्लक आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) सो.) :-**

त्याच्यामध्ये जी बाकी आहे. ती आपण जी फाईनची रक्कम घेतो. त्या फाईनची रक्कम साधारणतः दंडाची जी रक्कम आहे ती मा. महासभेने दिलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

घरपट्टीचा विषय चालू आहे. तर आपण अगोदर घरपट्टीचा विषय घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) सो.) :-**

घरपट्टीच्या विषयाच्या अनुषंगाने मी खुलासा करत होतो की, मा. महासभेने मागच्या दोन मा. महासभेच्या पूर्वी शहरामध्ये जे असमानता घर आकारणी आहे. त्या अनुषंगाने कारवाई करावे असे निर्देश होते आणि ज्या घरांना टॅक्स लागला नाही त्यांना टॅक्स लावण्याचे निर्देश होते. ही बाब प्रशासनाने प्राधान्याने मनावर घेउन त्या अनुषंगाने कार्यवाही करत असल्यामुळे दैनंदिन वसुलीचे डिमांन्ड देणे प्रलंबित राहिलेले आहे आणि त्या अनुषंगाने सविस्तर श्री. विजय पाटील आपल्याला सांगतिल. नविन घरांना कर आकारणी करण्यासाठी आपण स्कॉड तयार केले आहेत. ती बाब आपल्या निर्दशनात आली असेल. प्रत्येक भागामध्ये आमचे निरीक्षक फिरुन त्याचा सर्व्हे करुन साधारणतः पाच कोटीची ॲसेटस् ह्यावेळेला डिमांड झालेली आहे. नविन कर आकारणीमध्ये आपण महिन्या अखेरपर्यंत त्याचा समावेश करणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

खतगांवकर साहेब, आता मधे श्री. म्हात्रे साहेबांनी एक प्रकरण आणले होते. पाचशे रुमधारकांना कर आकारणी झाली नव्हती. त्यांनी परवानगी घेतली का? त्यांच्याकडे पाण्यासाठी फाईल होते. त्यांना आपण कर आकारणी न करता त्यांच्या फाईल घेतल्या का? ते पूर्ण झाल्या का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) सो.) :-**

प्रोग्रेसमध्ये आहे आणि ते सुद्धा काम त्यांनी हाती घेतलेले आहे. यासोबत घरांचे जे डिपेनशिएट होते म्हणजे कमी जास्त दराची जी घर आकारणी केली होती त्याच्यासुद्धा आपण अंतिम टप्प्यात आलेली आहोत. यामुळे घरपट्टीच्या अनुषंगाने दैनंदिन वसुलीवर त्याचा थोडाफार परिणाम झालेला आहे. श्री. विजय पाटील याबाबत जर आपले अजून काही म्हणणे असेल तर ते आपण सभागृहासमोर मांडावे.

**विजय पाटील :-**

नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, जी इमारत तयार आहे आणि काही इमारतींना टॅक्सेस लागलेला नाही. त्याच्यावर कर आकारणी करायचे अशा पद्धतीने ज्यावेळेला बजेटच्या मिटींगमध्ये सर्वानुमते ठरले होते. त्याचा सर्व्हे करणार होता आणि लगेच कर आकारणी करणार होते. ते झाले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

मी तेच सांगतोय. आपण साधारणतः पाच कोटींचे आपण ॲसेसमेंट केलेले आहे अजून दोन कोटी त्याच्यामध्ये ॲड होतील तर साधारणतः ह्या दोन हफ्त्यामध्ये त्यांना बिल इश्यू होतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे येणाऱ्या कालावधीमध्ये त्यांना बिल मिळतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

होय. पुढच्या येणाऱ्या महिन्यामध्ये त्यांना बिल मिळतील.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, घरपट्टीची वसुली ही सप्टेंबर महिन्यामध्येच खऱ्या अर्थाने चालू होईल.

**रतन पाटील :-**

विजय पाटील साहेब, आपण जो इमारतीचा सर्व्हे केला तो कशापद्धतीने केला?

**विजय पाटील :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आता महानगरपालिकेने घरपट्टी कराचा सर्वेक्षण करायचे घेतले आहे ते सन २००५-०६ या वर्षामध्ये महानगरपालिकेने घरपट्टी कराचे सर्वेक्षण करायला घेतलेले आहे. या घरपट्टी कराचे सर्वेक्षण करत असताना महानगरपालिकेचा करनिरीक्षक, निरीक्षक, प्रभागामधला प्रभाग अधिकारी ह्यांना त्याची जबाबदारी दिलेली आहे आणि त्यांच्यावर आणखिन दोन सहाय्यक आयुक्त नेमलेले आहेत. घरपट्टीकरिता आमचा प्रत्येक कर्मचारी, प्रत्येक इमारतीमध्ये जाउन त्या इमारतीला कराची आकारणी झालेली आहे किंवा नाही हे पाहतो आणि कराची आकारणी करुन देतो. ह्या सर्वेक्षणामध्ये बहुतेक ठिकाणी ज्या नविन इमारती झालेल्या आहेत त्या नविन इमारतीचे आम्ही सर्वेक्षण केलेले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, जे रेसीडन्स आहे त्याच्यामध्ये व्यावसायिक स्वरूपाचा रूम घेतलेला आहे त्याला आपण कमरशियलचा रेट लावणार का? अशी आपल्याकडे नोंद आहे का?

**विजय पाटील :-**

या सर्व्हेमध्ये निवासी दराने आकारणी केलेली आहे आणि बिगर निवासी दराने त्या मालमत्तेचा उपयोग करत असतील तर ह्या सर्वेक्षणामध्ये त्याची नोंद आम्ही घेतलेली आहे आणि तसे झालेले आहे. त्यांना नोटीस देउन त्यांचे ऑब्जेक्शन सजेशन मागवून नंतर ती मागणी फायनल करतो.

**एस. ए. खान :-**

साहेब, माझ्याकडे अशी केस आहे की, ते बिगर निवासी आहे पण निवासी आहेत. बिगर निवासी म्हणून कर आकारणी झालेली आहे तर ते काय करणार? दहा वर्षापासून तुम्ही बिगर निवासीचे केलेले आहे. पण ते निवासी आहे. सुरूवातीपासून बिल्डरने ॲग्रीमेंट दिलेले आहे, फ्लॅट म्हणून दिलेले आहे. पण बिगर निवासीचे, तुमचे लोक जबरदस्तीने जाउन थकबाकी वसुल करतात की, पैसे भरा. कारण ह्यामध्ये तुमचे दुकान आहे असे दिले आहे. तो नागरिक सांगतो की, हे घर आहे येथे फॅमिलीवाले राहतात. तरी दुकान आहे असे आपण करता अशा प्रकरणाचे काय?

**विजय पाटील :-**

अशा आकारणीमध्ये आम्ही सुधारणा करून घेउ.

**एस. ए. खान :-**

तुमच्या लोकांनी दहा वर्षापासून बिगर निवासीचा टॅक्स लावला आहे तो भरा. तो कसा काय भरणार? ते तर निवासी आहेत ना.

**मिलन पाटील :-**

कदाचित, ते घरामध्ये व्यवसाय करत असतील.

**एस. ए. खान :-**

नाही. तसा रिपोर्ट आहे, अहवाल आहे ना.

**विजय पाटील :-**

ज्यावेळी आम्ही कर आकारणी केली तेव्हा त्यांनी त्या कर आकारणीवर ऑब्जेक्शन घेतले का, दहा वर्षापूर्वी?

**एस. ए. खान :-**

ते बिल्डरने करून दिले. त्याला काय माहिती ॲग्रीमेंटमध्ये बिल्डर काय करतो? ते बिल्डरने करून दिले आहे.

**रतन पाटील :-**

सदर बिल्डरने ते दुकान म्हणून करुन दिले असेल ना.

**विजय पाटील :-**

बिल्डरने जर शॉप म्हणून दिले असेल तर आम्ही शॉप म्हणून त्याप्रमाणेच कराची आकारणी करणार. बिल्डरने यादी दिली असेल की, १ ते १० पर्यंत शॉप आहेत. तिथे दुकान टाकून बिगर निवासी दराने आकारणी केली असेल ना. प्रत्येकवेळी बिल्डर रजिस्टर ॲग्रीमेंट देतो असे नाही. फक्त याद्या देतो.

**एस. ए. खान :-**

तो व्यक्ती चार-पाच वर्षापासून भांडत आहे की, ते माझे घर आहे, घर आहे. मग तुम्ही निवासी दराने आकारणी केली पाहिजे.

**मा. सभापती :-**

कदाचित, तिथे दुकान चालू असेल.

**एस. ए. खान :-**

दुकान नाही. ते घरचं आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

विजय पाटील साहेब, जेव्हा तुम्ही इमारतींचा सर्व्हे करता, झोपडपट्टीमध्ये दहा बाय दहाचा गाळा असेल किंवा रहिवास असेल ते २० बाय २५, २० बाय १० असे असते. ते तुम्ही तुमच्या सर्व्हेमध्ये ते घेता का? टॅक्स लावला जातो १० बाय १० च्या रुमचा आणि त्याचा जो रुम असतो तो २५ फुट, ३० फुट लांबलचक असतो. त्याच्यावर तुम्ही काय कार्यवाही केलेली आहे? त्या टॅक्सवर?

**मिलन पाटील :-**

मागच्या वेळी ह्याबाबत तक्रार केली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

महानगरपालिकेचा महसुल वाढवण्यासाठी, गेल्या सभेमध्ये आपण असे ठरवले होते की, प्रत्यक्षात पाहणी करुन त्याच्यामध्ये जे दहा बाय दहाचे रुम असतील त्याच्यावर तुमच्याकडून टॅक्स लावला जातो व जे वाढीव बांधकाम होते त्या वाढीव बांधकामावर टॅक्स लागत नाही आणि परत पहिला माळा बनवला जातो त्याच्यावरही टॅक्स नसतो. माझ्या मते अजून ह्याबाबतचा सर्व्हे झालेला नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही मला ह्याचा जवाब दिला होता की, आमची रिव्हीजन होईल त्यांच्यामध्ये आम्ही हे घेउ. जो दोन हजार दोनशेचा गाळा आहे आणि आपल्या असेसमेंटवर दोनशे लिहितात आणि त्यांच्याकडे जी पावती असते त्याच्यावर दोन हजार रुपये लिहितात. तुमको यह दो हजार का यह दिया ना, तुम दो सो काही टॅक्स भरो. ह्याबाबत मी तुमच्याकडे रायटिंगमध्ये कम्प्लेंट केलेली आहे आणि आपल्या हायवे पट्ट्यात आणि इतर ठिकाणी सुद्धा हिच परिस्थिती आहे. सन्मा. सदस्य सूर्यकांत भोईरजी ह्यांनी सांगितलेले आहे. तशा बाबतीत तुम्ही कोणता टॅक्स घेता? तुम्ही मला हे आश्वासन दिले होते की, हे रिव्हीझनमध्ये घेउ आणि ते ॲक्च्युअलमध्ये दोन हजाराचा गाळा वापरतात. साहेब, दोनशेच्या जागी दोन हजाराचा गाळा वापरतात. आपल्या ॲसेसमेंटला दोनशे आहे आणि मी त्याचा सबूत दिला होता. आपल्या ॲसेसमेंटला दोनशेचे आहे. आपली लोक तिथे जातात आणि बोलतात, तुमको क्या करनेका है, दो सौ का टॅक्स लगानेका है ना, तो हम दो सौ का टॅक्स लगाके देता है तुम दो हजार का गाला वापरो, आपको लिखके दिया ना दो सौ का, देखा कितना तुम्हारा फायदा किया अठरासो फुट का फायदा करके दिया। अभी एक लाख रुपया आप हमको दे दिजीए।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्य आपण जे म्हणता, ते प्रकरण आपल्याकडे आहे.

**मिलन पाटील :-**

त्यांना मी दिले आहे. त्यांना विचारा रिव्हीजनमध्ये त्यांनी घेतले का?

**मा. सभापती :-**

असे असेल तर वसुल करा आणि त्याच्यावर कारवाई करुन टाका.

**मिलन पाटील :-**

विजय पाटील हे मी तुम्हाला दिलेले आहे का, नाही.

**विजय पाटील :-**

होय.

**मिलन पाटील :-**

कबूल आहे, बघा.

**मा. सभापती :-**

विजय पाटील, आपण त्या मालकाकडून तेवढ्या वर्षाचा टॅक्स वसुल करा आणि संबंधित असा करणारा जो आहे त्याच्यावर कार्यवाही करा.

**मिलन पाटील :-**

आपल्या अधिकाऱ्यावर कार्यवाही का नाही करायची?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपल्याकडे इंडस्ट्री एरिया आहे. त्यामध्ये झोनमधले म्हणजे ग्राउण्डप्लसवाले आहेत त्यांना आपण टॅक्स लावला आहे का?

**विजय पाटील :-**

इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये खाली गाळा आहे आणि वर जे एक्स्ट्रा वाढवलेले आहे त्याचे सर्व्हेक्षण आम्ही केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे त्यांना आपण टॅक्स लावणार?

**विजय पाटील :-**

त्यांना टॅक्स बिल आम्ही दिलेले आहे. कृषि इंडस्ट्रीयल इस्टेट म्हणा, अमर फेम वगैर ज्या इंडस्ट्रीयल इस्टेट आहेत, त्यांनी खाली स्लॅब टाकला आणि त्याच्यावर एक मजला वाढवलेला आहे. त्या प्रापर्टीचे सर्वेक्षण केलेले आहे. सर्व्हेक्षण करुन त्याचे टेम्टेशन केलेले आहे. खतगांवकर साहेबांनी याबाबत सभा बोलावली होती. त्याच्यामध्ये प्रभाग अधिकारी श्री. वाघ आहेत त्यांच्याकडून ही आम्ही रिपोर्ट घेतलेले आहेत व त्यांना लेखी देखील दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही त्यांना टॅक्स लावाल तेव्हा लावाल. पण त्याचबरोबर त्यांनी परवानगी घेतलेली आहे का? परवानगी शुल्क देखील आकारायला पाहिजे. त्यांनी परवानगीचे नुकसान केलेले आहे.

**मिलन पाटील :-**

आपण दहा हजार रुपये घेतो.

**रतन पाटील :-**

हे आपले रक्षण करणार, महापालिकेचे. तुम्ही टॅक्स लावताना सोडून देणार. परवानगी कोण घेणार? परवानगीचे पैसे कोण वसुल करणार?

**मिलन पाटील :-**

उपायुक्त साहेब, मी मागे एक लेटर दिले होते. त्याबाबत आपणाला सांगितले होते. आपण आता ही जी ग्रॅज्युएट लोकांची नेमणूक केलेली आहे. ह्याच्याबाबतीत आपले एक एक डिपार्टमेंटला चार-चार , पाच-पाच शिपाई आहेत आणि ते नुसते खोगीर भरत आहेत. आपले जे सफाई कामगार होते ते सर्व शिपाईमध्ये आलेले आहेत. मी त्यावेळी तुम्हाला सुचना होती की आपले चार प्रभाग आहेत आणि चार प्रभागामध्ये एक एक प्रभागाला एक एक उपायुक्त द्या आणि वीस वीस कर्मचारी द्या. ही जी फुगीर भरती आहे. आणि जे बसलेले शिपाई आहेत त्यांना बाहेर काढा आणि आता आपण जी नवीन नेमणूक केली आहे त्याच्यामध्ये ही एक टिम करा. वीस-पंचवीस माणसांची एक टिम तयार झाली पाहीजे आणि त्या प्रभागामध्ये सोडा आणि त्यांच्याकडून हे खोदून काढा असे मी लेटर दिलेले होते. उपायुक्त साहेब, लेटर तुमच्याकडे आलेले नाही. त्याच्यावर अर्ज देउन एक महिन्याच्यावर होउन गेले. मी जे लेटर दिले ते तुमच्याकडे आले का? ह्याच्यावर जो चांगला सुझाव आहे त्याच्यावर सुरुवात करून घ्या. एकेका डिपार्टमेंटमध्ये चार-चार, पाच-पाच शिपाई आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

आमचे हायवेच्या इथे अशी परिस्थिती आहे की, ग्राउंडला दहा बाय दहाच्या रुमला टॅक्स लागतो आणि वाढवलेली जी जागा असते त्याला ही टॅक्स नसतो आणि वर वाढवले जाते त्यालाही टॅक्स नसतो. बजेटच्या मिटींगच्या वेळी आपण जेव्हा बजेट फुगवतो तेव्हा त्याच्यावर जी कार्यवाही केली जावी ती कार्यवाही होतच नाही. आम्ही त्यावेळीही बोललो होतो की, सर्व्हे करताना हे सर्व टॅक्सेस करुन घ्या. पण त्याच्यावर अधिकृत सर्व्हे झालेला नाही.

**प्रभात पाटील :-**

कार्यवाही कशी केली जाते हे मी तुम्हाला सांगते. काशी, नवघर रोडला जुनी इमारत आहे. ९९ हजार रुपये टॅक्स बाकी होता आणि तेही एकाच माणसाचा. एका व्यक्तीचा, बिल्डर असेल त्याचा आणि बाकीचे वीस फ्लॅट ओनर त्यांचा टॅक्स क्लिअर आहे. एका माणसाने ९९ हजार रुपयांचा टॅक्स थांबवलेला आहे. तो किती वर्षाचा टॅक्स असेल? आणि त्या लोकांना पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन नाही म्हणून ते माझ्याकडे आले, ही दिड वर्षाची गोष्ट असेल. मी म्हटले या माणसाला पकडा , ह्या एका माणसामुळे त्या वीस लोकांना पाण्याचे हाल आहे का, तर त्यांचा टॅक्स वसुल होत नाही आणि टॅक्स वसुल केल्यानंतर त्यांना पाण्याचे कनेक्शन मिळाले. म्हणजे आपण कोणत्या लोकांना हे करतो. आपल्याकडे अशी पद्धत आहे की, आपण एखाद्या माणसाला इतके कन्सीडर करतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

मी, आपल्याला थोडक्यात माहिती देतो की, नविन कर आकारणीमध्ये आपले जे विविध वसुली निरीक्षक आहेत. त्यांच्या माध्यमातून त्यांच्या टिम मार्फत काम घेत आहोत. इंडीव्ह्युजव्हल इश्यु असू शकतात. पण आपण ते टॅकलसुद्धा करतो. ह्याच्यामध्ये न्याय मिळत नाही असे नाही पण वेळ लागेल. वस्तुस्थितीमध्ये घोडबंदर श्री. प्रभाकर म्हात्रे त्यांच्या टिमकडून साधारणतः ७९ इमारतींचा सर्व्हे पूर्ण झालेला आहे. म्हणजे

ज्याला नविन टॅक्स नव्हता असे. ६७ इमारतींची आकारणी पुर्ण झालेली आहे. साधारणतः अडीच हजारच्या वर तिथे मालमत्ता आहे, फ्लॅटस् आहेत. ४६ लाखाची डिमांड कायम केलेली आहे. उर्वरित १२ इमारतींचा सर्व्हे झालेला आहे. त्याच्या आकाणीचे काम प्रगतीपथावर आहे आणि ह्या दो हफ्त्यामध्ये घोडबंदरचे काम पुर्ण होणार आहे.

**केशव घरत :-**

साहेब, आमच्या येथे अशी तक्रार आहे की, चेना येथे श्री. नंदू पाटील म्हणून आहेत....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मी, एकदा ह्या सर्व बाबी सांगितल्या की, आपण वैयक्तिक काय.....

**केशव घरत :-**

साहेब, आपण प्रभाग व्हाईस सांगत आहात म्हणून मी विचारतो की, त्यांनी आम्हांला सांगितले, आम्हाला असा आदेश आहे की, सद्या ज्या नवीन झोपडपट्टया आहेत त्यांना कर आकारणी करायची नाही. मग आपला हा महसूल बुडत नाही का? आज ठिक आहे, जर सरकारी पडतच्या जागेवर असतील....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

सन १९९५ पुर्वीच्या ज्या झोपडपट्टया आहेत त्याला आपण टॅक्स लावतो.

**केशव घरत :-**

म्हणजे, १९९५ नंतरच्या ज्या झोपडया आहेत त्यांना टॅक्स लावायचा नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

त्याला शासनाच्या सुचना पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण त्यांना पाणी देतो, लाईट देतो.

**केशव घरत :-**

महापालिका त्यांना पाणी देते, लाईट देते, रस्ते देते मग आपल्या महापालिकेचा खर्च वाढत नाही का?

**सुर्यकांत भोईर :-**

टॅक्स घ्यायचा का नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण ते तपासून घेऊ. बघू त्याच्यात काय करता येईल? शासनाचे काय निर्देश आहेत आणि आपल्याला त्यांच्याकडून टॅक्स कशाप्रकारे वसुल करता येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

अनधिकृत झोपडपट्टी आहेत ते आपण तोडायला पाहिजे पण ते तोडत नाही.

**केशव घरत :-**

तोडत तर नाही आणि ती पक्की घरं होतात तरी तिथे आपण बघत नाही व ते आपल्याकडे मागण्या करतात की, घरपट्टी लावण्यात यावी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

साहेब, आम्ही त्याची दक्षता घेऊ की, काय निर्देश आहेत ते तपासून त्या अनुषंगाने कार्यवाही करू.

**जयंत पाटील :-**

तोपर्यंत खुप उशीर होतो ना, ते बघायला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

चेन्ना येथे १५२ मालमत्ता आयडेनटीफाय झाल्या आहेत आणि त्याला आकारणी करून साडेचार लाखाची आपली डिमान्ड वाढलेली आहे आणि त्या डिमान्डला नोटीस देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**मिलन पाटील :-**

म्हणजे हॉटेलला कमर्शिअल केलेले आहे की काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

वापर जसा असेल तशी त्याची आकारणी आहे. रहिवासी असेल तर रहिवासी आणि कमर्शिअल असेल तर कमर्शिअल. वीस लक्षाची डिमान्ड पुर्ण झालेली आहे. नऊ मालमत्ताची आकारणी पुर्ण झालेली आहे. दोन मालमत्ता....

**केशव घरत :-**

साहेब, चेनाचे सांगतात का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

नाही, काशीगावचे सांगत आहे.

**केशव घरत :-**

साहेब, माझा चेना येथील प्रश्न होता की, जे आदिवासी पाडे आहेत त्या आदीवासी लोकांना जी घरपट्टी आकारली जाते तर त्यांची कुडाची वगैरे घर असतात. त्यांना सरसकट आकारणी केली जाते. तर त्याच्यावर काय करता येईल का आपल्याला? चेना, काजूपाडा, वर्सोवा येथे घर आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांच्यात काही स्ट्रक्चर जे असते. घराचे बांधकाम पक्का, कच्चा त्याप्रमाणे टॅक्स लागले जाईल. कच्चे घर असतील तर कमी दराने आकारणी केली जाईल.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, काशीगावात कीती वसुली झालेली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

काशीगावात अकरा बिल्डींग आयडेंटीफाय झालेले आहेत. व साधारणतः तीनशेच्यावर मालमत्ता आहे आणि साधारणतः २० लाखाची डिमान्ड राहिलेले आहे.

**डॉ. रमेश जैन :-**

साहेब, यह क्लब के अंदर क्या होता है? जैसे जी. सी. सी. क्लब है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

जहाँ अपना ॲसेस नही हुआ है ऐसे जो नई इमारते है। उसमें सुधार हुआ है। तो हर उसका सर्व्हे कर रहे है।

**डॉ. रमेश जैन :-**

शादी के लिए पुरा ग्राउंड युझ करके रखा है और नुकसानी हो रही है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

त्याची सर्व डिटेल घेउ त्याकरिता काही प्रॅाब्लेम नाही. घोडबंदर, श्री. पाटील भार्गव आहेत त्यांचे ५३ इमारतींचा सर्व्हे पुर्ण झालेला आहे. ३२ इमारतींची आकारणी पुर्ण झालेली आहे. साधारणतः १७ इमारतीं बाकी आहेत व साधारणतः ३० लक्षाची वाढ त्याच्यामध्ये झालेली आहे आणि उर्वरित १७ इमारतींची साधारणतः वीस लक्षाची वाढ होईल. हे काम प्रगतीपथावर आहे. श्री. जगदिश भोपतराव, मिरा रोड - ६० इमारतींचा सर्व्हे पुर्ण झालेला आहे. ७७ लाखाची जास्तीची डिमांड ॲड केलेली आहे. अजून ४० इमारतींची आकारणी शिल्लक आहे. फक्त नविन इमारतींचे सांगत आहे. इ-४, इ-५ मध्ये श्री. दशरथ हंडोरे आहेत. २८ इमारतींची आकारणी पुर्ण केलेली आहे. ४२ लाखाची वाढ झाली आहे. ३२ इमारतीचे कागद तपासण्याचे काम प्रगती पथावर आहे. भाईंदर पश्चिम मध्ये श्री. साळवे म्हणून आहेत त्यांनी २२ इमारतींचे सर्व्हे केलेले आहे आणि साधारणतः पंधराशे मालमत्तांना आकारणी केलेली आहे आणि २१ लक्षाची त्याच्यामध्ये भर पडलेली आहे. अजून शिल्लक जे १२ इमारती आहेत त्याच्यामधून १० लक्षाची अपेक्षा आहे. म्हणजे हे काम पूर्ण प्रगतीपथावर आहे. श्री. इंद्रजीत शिंदे, प्रभाग क्र. ३ - ९० मालमत्ता त्यांनी आयडेंटीफाय केलेल्या आहेत. साडेपाच लाखाची डिमांड केलेली आहे. अजून दोन आठवड्यामध्ये उर्वरित कमी....

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, भाईंदर पुर्वेचा सर्व्हे झाला का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

होय.

**प्रेमनाथ पाटील :-**

पुर्वेला फक्त ९० लाखांची वसुली झाली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

नाही, अजून आहे ना. श्री. शशिकांत पाटील, ह्यांनी ७० मालमत्ता आयडेंटीफाय केलेल्या आहेत. अडीच लाखाची त्यांनी दिलेली केलेली आहे. अजून २५ एक मालमत्तेचे त्यांचे सर्व्हेचे काम चालू आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, पुर्वेला ज्या जुन्या इमारती आहेत. तीन ते चार माळ्यांचे होते. त्याचे आता टॉवर झालेले आहेत आणि ते टॉवर सगळे भरलेले आहेत, लोक राहायला देखील आलेले आहे. मग त्या लोकांनी एक्स्ट्रा रुम केलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

ते आहे ना. तसे ४९ बिल्डिंग आहे. १० बिल्डिंगची आकारणी पुर्ण झालेली आहे. त्यात पंधराशे फ्लॅट्स आहेत. तिथे ७५ लाखाचे डिमांड होणार आहे.

**मिलन पाटील :-**

तिथे टाऊन प्लानिंगला कशाला दिलेले आहे. जे रिव्हीजनमध्ये दिलेले आहे. टाऊन प्लानिंगने त्यांना जी परमिशन दिलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

कर आकारणी करताना परवानगीचा विचार आम्ही करत नाही. सन्मा.सदस्य मिलन पाटील साहेब बोलल्याप्रमाणे आपल्या शहरामध्ये जे काही मालमत्ता आहे. मग ते कोणत्याही स्वरुपाचा असो. त्यांना टॅक्स लावण्याचे अधिकार आहेत. त्याचा वापर करुन ही कारवाई चालू आहे.

**जयंत पाटील :-**

आत्ता आपण सांगितल्या प्रमाणे त्या इमारती एक वर्षाच्या आहेत की, त्या अगोदर झालेल्या आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आम्ही आपल्याला अवगत करु इच्छितो की, ज्याचा वापर आपल्याला सिद्ध होतो. उदा. पाण्याचे कनेक्शन आहे. तिथे आपण काही एन. ओ. सी. दिलेले असतील पण टॅक्स लागलेला नसेल किंवा परवानगी असेल. असे एव्हीडन्स घेऊन शक्यतो त्या तारखेपासून ते टॅक्स आपण वसुल करायचे.

**जयंत पाटील :-**

त्यांच्या ॲग्रिमेंटवरुन आपल्याला कळेल ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

कळेल, आपण त्याच पद्धतीने करतो.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, सर्व्हे करतांना झोपडपट्टीमध्ये ज्या चाळी आहेत व तिथे जे वाढीव बांधकाम आहे तिथे अगोदरच लक्ष द्या. तिथे जर आपण लक्ष दिले तर आपला महसूल वाढू शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

ही कारवाई सतत चालू ठेवली जाणार आहे आणि यामध्ये प्रत्येक निरिक्षकाकडून आम्ही प्रमाणपत्र देणार आहोत आणि सद्यस्थिती अवगत करुन, काउंटर चेक करु आणि आपल्या इतर अधिकाऱ्यांमार्फत परत पाहणी करु. जेणेकरुन सर्व प्रॉपर्टीला टॅक्स लागला जाईल.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, तिथले प्रॉपर नगरसेवक आहेत त्यांना ही सोबत घेऊन सर्व्हे करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

अपेक्षाच ही आहे की, आपल्या सर्वांना ही माहीती व्हावी. ही मोहीम चालू आहे.

**मा. सभापती :-**

सर्व्हे करत असताना, घोडबंदर मिरा येथे भानूराम पाटील आहेत. त्याचीही शहानिशा करा. मधल्या काळामध्ये मला ह्याचा फार अनुभव आलेला आहे की, बऱ्याच ठिकाणी दोन वर्षाचा टॅक्स जर बिल्डरला भरायचा असेल तर बिल्डर चहापाणी देतो आणि ते पटवतो. हे मी स्पष्ट सांगतो.

**मिलन पाटील :-**

सभापतींचे हे म्हणणे आपल्याला गांभीर्याने घ्यावे लागेल. श्री. विजय पाटील याबद्दल आपले काय म्हणणे आहे. त्यांना विचारा ना.

**रतन पाटील :-**

या विषयामध्ये गांभीर्य आहे.

(सभागृहात गोंधळ)

**विजय पाटील :-**

साहेब, शांती नगर संकुलामध्ये ज्या लोकांना पुढे पत्रे काढले होते. आपल्या अनधिकृत बांधकाम विभागाने ते पत्र काढून टाकले. पण त्याच्या अगोदर सर्वेक्षणामध्ये कराची आकारणी केली होती आणि आता संपूर्ण शांती नगरमधून जेवढया वेदर शेडस् होत्या तेवढ्या काढून टाकल्या. त्यामुळे जी लावलेली कर आकारणी आहे ती आता कंटीन्यू आहे. पुढे चालत आलेली आहे. काढून टाकल्या मुळे आपण ती बंद करायला पाहीजे. पण एखाद्या मालत्तेला कराची आकारणी केल्यामुळे आपण ती बंद करायला पाहीजे. पण एखाद्या मालत्तेला कराची आकारणी केल्यामुळे ती बंद करायला खूप त्रासिक जाते ती रक्कम निर्लेखित करायची असेल तर सगळयांपासून परवानगी लागते. आम्ही रिपोर्ट करणार नंतर ती लेखा विभागाकडे जाणार त्यांच्यानंतर उपायुक्तांकडे जाणार, उपायुक्तांकडून लेखा विभागाकडे आणि नंतर फायनल आयुक्त साहेबांची परवानगी घेणार. ह्या प्रोसेसला फार वेळ लागतो.

**रतन पाटील :-**

म्हणजे आपल्याला म्हणायचे आहे की, वेदर शेडसला कराची आकारणी करायची नाही का?

**विजय पाटील :-**

ते जर त्याचा उपयोग करत असतील तर आकारणी करायची.

**रतन पाटील :-**

तसे आहे.

**विजय पाटील :-**

वेदरशेडसला आपण परवानगी देताना टेम्पररी देतो.

**मिलन पाटील :-**

नवरंग हॉटेलचे काय करता? नवरंग हॉटेलवाला जो वेदरशेडस वापर करतो त्याला तुम्ही टॅक्स लावता का, नाही?

**विजय पाटील :-**

ते मला पहावे लागेल. पाहून तुम्हाला सांगतो.

**रतन पाटील :-**

परवानगीचे शुल्क आणि वेदरशेडसला कर आकारणी करावीच लागणार आहे. बजेटच्या वेळेला हे सगळे विषय झालेला आहे. तरी आपण अजून टॅक्स घेतच नाही.

**मिलन पाटील :-**

श्री. विजय पाटील साहेब, नवीन एखादी गोष्ट असेल ना तर ठिक. पण नवरंग हॉटेल गेल्या सहा वर्षापासून आहे. आता जर तुम्ही, पहावे लागेल असे बोलले तर सहा वर्षे तुम्ही काय केले?

**प्रेमनाथ पाटील :-**

हॉटेल, शिव साई हॉटेलला सेम कंडीशन आहे.

**विजय पाटील :-**

आम्ही तुम्हाला ते पाहून सांगतो. जर परमनंट असेल तर त्याला लावायचा प्रयत्न करु.

**रतन पाटील :-**

अंदाज पत्रकाच्या वेळेला याबाबत आपण सर्व चर्चा केली होती. हे सर्व चर्चेला आले होते व त्याच्यावर कर आकारणी करणार आहे म्हणून ठरले होते. ती उत्पन्नाची बाब आहे. महापालिकेच्या दृष्टीने उत्पन्नाची बाब आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

पाटील साहेब, जिथे इमारती झालेल्या आहेत आणि त्या घरांच्या पावत्या अजुनपर्यंत येतात. इमारती झालेल्या आहेत त्या इमारतीच्या पण पावत्या येतात आणि टॅक्समधून आपले कर्मचारी येतात व शोधत राहतात. बिचाऱ्यांना तिथे कोण सापडणार. कारण तिथे कोणीच नाही. मग ते लोक पैसे कुठून भरणार? त्यांच्या पॉकेटमधून पैसे भरणार का ते?

**विजय पाटील :-**

एखादी इमारत पडली आणि त्याच्यावर नविन इमारत झाली........

**ग्रिटा फॅरो :-**

पण ती जास्त जुनी नसणार.

**विजय पाटील :-**

पण ज्या व्यक्तीने इमारत पाडली आणि नविन बांधली तर त्या माणसाने समोरुन येऊन आम्हाला सांगायला पाहिजे की, इमारत पडलेली आहे आणि तिथे नविन टॉवर झालेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांना तुम्ही नविन टॅक्स लावता की नाही? मॅडमचे म्हणणे बरोबर आहे. मग तेच नांव तुम्ही कसे चालू ठेवता. ते बंद करायला पाहिजे.

**ग्रिटा फॅरो :-**

आपली बरीचशी लोक येतात. मी किती लोकांना सांगितले की, हा टॅक्स बंद करण्यात यावा आणि जी इमारत नाही आहेत त्यांना......

**विजय पाटील :-**

असे मान्यताधारक असेल ना तर त्याची यादी द्या.

**ग्रिटा फॅरो :-**

यादी दिलेली आहे.

**विजय पाटील :-**

तीन तीन माळे आहेत. ते पण आम्ही लगेच सामावून घेऊ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आता आपण मालमत्ता कराबाबत सांगत होता. तर आपण आता भाईंदर पश्चिम-पूर्व, घोडबंदर हायवे सगळ्या विभागाचे आपण सांगितले. परंतु, त्याच्यामध्ये आपल्याला सर्व रेसिडेनशीयल मालमत्ता सापडल्या. बहुतेक कमर्शियल घेतले नाही. फक्त हायवेला, भाईंदर पूर्वेला जवळ जवळ भरपूर इंडस्ट्रीमध्ये त्या लोकांनी गाळे वाढवलेले आहेत. मी हा विषय सांगितला. सगळ्या सन्मा. सदस्यांनी. परंतु, तुमच्या ह्याच्यामध्ये आलेले नाही आणि आपला जो क्लार्क आहे, शोधणारे जे डिपार्टमेन्टची माणसे आहेत त्यालोकांनी फक्त मालमत्ता शोधल्या, रेसिडेनशीयल, कमर्शियल शोधल्या नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

इंडस्ट्रीयल एरियामधून दहा लक्षाची वाढ आहे.

**ध्रुवकिशार पाटील :-**

फक्त दहा लक्ष.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दोन्ही, दोन्ही आहेत.

**ध्रुवकिशार पाटील :-**

साहेब, फक्त दहा लक्ष. तुम्ही जर ह्याच्यामध्ये डिटेल स्टडी केले तर एक करोड रुपयापेक्षा जास्त वाढतील. इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये प्रत्येक गल्लीमध्ये, प्रत्येक गावात गाळा हा वाढत जात आहे. ग्राऊन्ड प्लस वन आणि ग्राऊन्ड प्लस टू झालेले आहे. असे भरपूर इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये झालेले आहे. आपण ह्याच्यामध्ये पुर्ननियोजन केले तर कमीतकमी एक करोड रुपयाची वाढ अपेक्षित आहे. तसेच, आपल्या संक्षिप्त टिपणीमध्ये होर्डींगचे उत्पन्न साडे बारा लाख रुपये अपेक्षित आहे.

**प्रभात पाटील :-**

चांगले आहे, त्यांचे पण उत्पन्न वाढेल, टॅक्सचे.

**गजानन भोईर :-**

सध्या घरपट्टीचा विषय चालू आहे ना.

**ध्रुवकिशार पाटील :-**

भोईर साहेब, घरपट्टी, विशेष शिक्षण कर हे सर्व बिल दिलेच नाहीत. मग तुम्ही वसुली कशी काय अपेक्षित करता.

(सभागृहात गोंधळ)

**प्रेमनाथ पाटील :-**

आतापर्यंत जे सुचवले आहेत, इंडस्ट्रीमध्ये गाळ्यावाल्यांना टॅक्स लावायचा आहे आणि दुसरे, साहेबांनी जे चारही प्रभागामध्ये सर्व्हे केलेले आहे त्यांना तुम्ही कशी रुलिंग द्या की, ह्या गाळ्यांना लवकरात लवकर टॅक्स लावून घ्या. अन्यथा आपला बजेट असाच फुगत फुगत जाणार आहे व बजेट वाढणार आहे आणि हाथचा टॅक्स जाणार आहे. त्याच्यातले सहा महिने निघून गेले आहेत. प्रॉब्लम येतो. जे ठेकेदार आहेत त्यांना अजून बिल द्यायचे बाकी आहे. हे असे का होते? आपण लवकर लवकर ही कार्यवाही पूर्ण करा.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, उपायुक्त साहेब, माझ्या एवढ्या वर्षाचा असा अनुभव आहे की, पूर्वेला एकसे एक नविन बिल्डींग होत आहे. गेल्या पंधरा ते वीस वर्षमध्ये वीस माळ्यांची बिल्डींग बांधली आहे. त्याच्यात दहा गाळे केले ते दहा गाळे बिल्डरचे आहे. मग ती शिवराम बिल्डर असो किंवा कनकिया असो किंवा ओम साई असो, कोणीही असो. त्या प्रत्येक बिल्डरची आपल्याकडे थकबाकी आहे. तो बिल्डर कोण ते माहित नाही. त्याचे नांव तुमच्या रेकॉर्डला आहे. भाईंदर पूर्वेला प्रत्येक बिल्डींगमध्ये बिल्डरच्या नावावर थकबाकी आहे आणि ते सापडत नाही म्हणून आपली थकबाकी वाढली आहे. श्री. विजय पाटील ही गोष्ट जर खोटी असेल तर ती आपण सांगावी. बोला ना. ही आपली थकबाकी आहे आणि काही बिल्डर आपल्याला माहिती आहेत पण वसुली होत नाही. हे तुम्ही नमुद करा.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या बिल्डरचे नविन बांधकाम चालू होताना आपण ते थांबवायला पाहिजे की नाही?

**प्रभात पाटील :-**

अध्यक्ष साहेब, मला हेच सांगायचे आहे की, थकबाकी कशी थकते?

**सुर्यकांत भोईर :-**

त्याला नविन बांधकामासाठी परवानगी देऊ नका.

**मा. सभापती :-**

नगररचना अधिकाऱ्याला मी असे स्वतः पत्र दिलेले आहे.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, तुम्ही आता असें रुलिंग द्या की, ज्या सर्वेक्षणामध्ये कोणतीही एखादी बिल्डींग किंवा कंपनी राहिली तर ते जो सर्व्हे करणार असेल त्याची ती जबाबदारी राहिल. जाणूनबुजून कदाचित सोडण्याची शक्यता देखील आहे. त्यामुळे ती जबाबदारी त्याच्यावर राहिल. त्यामुळे आपण असे रुलिंग द्या की, त्याच्यावर काय कायदेशीर कार्यवाही करणार?

**जयंत पाटील :-**

सन्मा. सभापती, आता सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी जो विषय काढला तो चांगला विषय आहे. महत्वाचा विषय आहे. माझ्या प्रभागामध्ये एक कॉम्प्लेक्स आहे. कदाचित नांव सांगितले तर समोरच्या मंडळींना वाईट वाटेल. श्री. मंगल प्रभात व्होरा बीजेपीचे आमदार आहेत. त्यांनी रिकन्स्ट्रक्शन खाली येणारे रुम्स आपल्याला हॅन्डओव्हर केलेले नाही आणि त्याच्यामुळे त्या कॉम्प्लेक्सच्या लोकांना पाणी मिळत नाही. टॅक्स भरला नाही आणि ते आपल्या येथे ए.टी.पी.ला गेले. त्याच विकासकाचे दुसऱ्या ठिकाणी बिल्डींग चालू आहेत. आपल्या महापालिकेकडे.....

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांना परवानगी कशी दिली?

**जयंत पाटील :-**

त्यांना परवानगी देतात आणि ए.टी.पी. आपल्याला हॅन्डओव्हर करत नाही म्हणून त्यांना पाणी मिळत नाही. टॅक्स मिळत नाही. असे अनेक बिल आहेत.

**मिलन पाटील :-**

साहेब, आपण ह्याच्यावर रुलिंग द्या.

**एस. ए. खान :-**

आम्ही ऑक्युपाईज सर्टीफिकेट देत नाही म्हणून त्यांनी लोकशाही दिवसामध्ये अर्ज केलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, हा विषय आणला कोणी?

**मा. सभापती :-**

याबाबत मी स्वतः पत्र दिलेले आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेबांनी, स्वतःनी विषय सभेसमोर आणलेला आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. नगरसेवक मी ह्या प्रश्नाबाबत असे रुलिंग देतो की, खरं म्हणजे जो टॅक्सचा विषय आहे. आपण सांगतो ३ कोंटी ५३ लाखाचे बजेट केलेले आहे. मी बोलतो ५ कोटी रुपयाचे बजेट का होऊ नये? ५ कोटी होण्यासाठी जर आपण टॅक्सवर लक्ष केंद्रीत केले तर पुढच्या वर्षी ५ कोटीचे बजेट आपण घेऊन जाऊ शकतो. कारण इतिहास असा आहे की, जो विकासकर्ता आहे. आता जसे सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी सांगितले पण असे आहे की, नगररचना विभागाला मी स्वतः पत्र दिलेले आहे जो विकासकर्ता आहे त्याच्याकडे टॅक्स बाकी असतात. तुम्ही त्याला दुसऱ्या कामाला प्राधान्य देता कामा नये. जर आपण त्याला रोखले तरच तो आपल्या टॅक्स डिपार्टमेन्टला स्वतःहून टॅक्स भरेल. तुम्ही सांगितले की, विकास ब्लॉक घ्यायचे आहे ते न सांगता मी आणखीन पुढे जाऊन सांगतो की, बरेचसे फ्लॅट विकायचे असतात, भाड्याने दिले जातात. असे हजारो लोक असतील व त्यांच्याकडे टॅक्स बाकी आहे. ह्याच्यामुळे आपले फार नुकसान होत आहे. असा जो अधिकारी असेल, आपल्या रोजीरोटीवर एखादा व्यक्ती हात घालत असेल. आपल्याला पगार मिळाला आणि आपला पगार जर कोणी अर्ध्यातुन चोरुन नेला तर तो माणूस काय बोलत असेल त्याच्या मनाला काय वाटत असेल. त्याप्रमाणे आपण या शहराचा विकास करायला घेतला आहे आणि ह्याच्यातलाच एखादा अधिकारी त्याच्यावर हात घालत असेल की, एक करोड रुपयाचा होता आणि ते २५ लाखामध्ये पटवतो व ७५ लाख रुपये सोडून देतो. पाच-दहा हजारसाठी तर अशा अधिकाऱ्यावर तुम्ही कडक कार्यवाही करा. शहरातील वर्तमानपत्रात देऊन टाका. सस्पेन्ड केल्यानंतर सर्व वर्तमानपत्रात देऊन टाका आणि पुनश्च त्याला घेता कामा नये. कितीही मोठी शासनाकडे परवानगी घेऊ द्या. आतापर्यंत हेच चाललेले आहे. आतापर्यंत ज्या-ज्या कार्यवाही झालेल्या आहेतत्यांना आपण पुनश्च घेतलेले आहे. त्याच्यामुळे त्यांना वाटते की, ह्याच्यात काय होत नाही. अशामुळे ते अधिकारी सोकावले आहेत हे मी या ठिकाणी स्पष्ट सांगतो आपण खरोखर ह्याच्यावर लक्ष केंद्रित करा. तरच आपल्याला ह्या शहराचा विकास करता येईल. अन्यथा आपण या विकासापासून वंचित राहू.

**मिलन पाटील :-**

साहेब, रुलिंग म्हणजे निलंबित करण्याचे रुलिंग आहे. उपायुक्त साहेब, सन्मा. सभापती साहेबांनी आपल्याला काय रुलिंग दिलेले आहे ते तुम्हाला कळतं ना. जर कामात कसूर झाला तर निलंबित करता आले पाहिजे. साहेबांचे असे रुलिंग आहे हे आपण लक्षात ठेवा.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सभापती साहेबांनी सांगितले आहे की, जे भाड्यानें रुम्स आहेत, त्यासंबंधी आपला दर काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

टॅक्समध्ये ओनरच असावा असे काही नाही आणि ती अधिकृत असावी असे ही काही नाही. सदनिकाधारक असेल, वापरधारक असेल त्याच्याकडून तो टॅक्स वसूल केला जातो.

**जयंत पाटील :-**

साहेब, कदाचित आपल्याला टॅक्सबद्दल तुम्ही तुमची माहिती सांगा. वर्षानुवर्षे एखादा फ्लॅट भाड्याने आहे त्या संबंधी आपण कुठला टॅक्स आकारतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यामध्ये दोन गोष्टी आहेत. जर अकारण भाडे असेल म्हणजे एखादी एल.आय.सी. ऑफिस वगैरे रेसिडेनशीयल भाड्याला आपण मार्केट रिझनेबल टॅक्स लावतो.

**जयंत पाटील :-**

नाही साहेब. आपण आपले नियम काय आहेत ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जे आयडेन्टीफाय भाडे आहे. उदा. समजा एखाद्या बँकेला दिलेले आहेत तर तशा ठिकाणी आपण भाड्याने रेफरन्स घेतो.

**जयंत पाटील :-**

मी ते म्हणत नाही. एखादा रुम एखाद्या मालकाने वर्षानुवर्षे भाड्याने दिलेला आहे. फ्लॅट घेऊन ठेवलेले आहे आणि ते कायमचं भाड्याने दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हणजे सांगुनसुध्दा तो भाडेकरु निघत नाही का?

**जयंत पाटील :-**

निघण्याचा प्रश्न नाही. त्याचा टॅक्स तुम्हाला जास्त लागतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

टॅक्स जास्त लावायचे.

**एस. ए. खान :-**

पण ते करत नाही ना.

**जयंत पाटील :-**

आपण श्री. विजय पाटील ह्यांना विचारा ना. श्री. शिवमुर्ती नाईक साहेब असताना एक असेच प्रकरण आलेले होते. भाडेकरु असल्यामुळे त्याच्यावर प्रचंड टॅक्स लागला होता त्यावेळेस श्री. शिवमुर्ती नाईक साहेब आले होते. तो कुठला नियम आहे.

**विजय पाटील :-**

लिव्ह ॲन्ड लायसन्सवर त्यांनी विचार केला होता.

**जयंत पाटील :-**

मी लिव्ह ॲन्ड लायसन्सचेच म्हणत आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, हसण्यावर नेऊ नका. मिरा भाईंदरमध्ये असे हजारो फ्लॅट आहेत.

**एस. ए. खान :-**

असे दहा-दहा वर्षापासून कन्टीन्युअस भाड्याने रुम्स दिलेले आहेत.

(सभागृहात चर्चा)

**विजय पाटील :-**

लिव्ह ॲन्ड लायसन्सचे जे भाडे आहे ते काल्पनिक भाडे आहे.

**जयंत पाटील :-**

भाडे घेतात हे तुम्ही मान्य करता.

**विजय पाटील :-**

अकरा महिन्यासाठी जे लिव्ह ॲन्ड लायसन्ससाठी फ्लॅट दिलेले असतात त्यांना काल्पनिक भाडे असल्याने आपण त्यांना आपण कराची आकारणी करत नाही. एखादी प्रॉपर्टी आपण चार पाच वर्षासाठी दिलेली आहे. एक उदाहरण म्हणून तुम्हाला सांगतो की, ओस्तवाल आणि समोरची बिल्डींग आहे त्याच्यामध्ये स्टेट बँकेचे ए.टी.एम. सेंटर आहे आणि आय.सी.आय.सी.आय. बँकेचे ए.टी.एम. सेंटर आहे. तर त्या एका ए.टी.एम. सेंटरला काहीतरी ५५ हजार रुपये प्रतिमाह भाडे स्टेट बँकेच्या मालकाला आहे. त्याचे ॲग्रीमेंट झालेले ते पाच वर्षासाठी झालेले आहे. तर ५५ हजारावर आपण त्याला कराची आकारणी केलेली आहे. तसेच आय.सी.आय.सी.आय. बँकेला ए.टी.एम. सेंटर भाड्याने दिलेले आहे. त्या भाड्यावर आपण कराची आकारणी केलेली आहे. भाईंदर पश्चिमेला बँक ऑफ इंडिया आहे तिलासुध्दा भाड्यावर कराची आकारणी केलेली आहे. कॉर्पोरेशन बँक आहे त्यालासुध्दा आपण भाड्यावर कराची आकारणी केलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

समजा, बँक ऑफ इंडियाचे ८० हजार भाडे मन्थली आहे. मग त्याला आपण किती टक्के टॅक्स लावणार?

**विजय पाटील :-**

त्याचे रिटनेबल व्हॅल्यु काढतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

८० हजारावर किती असणार?

**विजय पाटील :-**

जे चार महिन्याचे अंदाजे भाडे आहे त्याला टॅक्समध्ये मापन घेतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजें वर्षाचे चार महिने आपण घ्यायचे.

**विजय पाटील :-**

वर्षाचे चार महिने आपल्या हातात आणि आठ महिने त्यांचे असे.

**रतन पाटील :-**

मला असे विचारायचे आहे की, विषय असा होता की, किती व्यावसायिक बिल्डर आहेत? त्यांचे किती आऊट स्टॅन्डीग बाकी आहे? तुमच्याकडे त्याची यादी आहे का? आपण आता विषयपटलावर सगळं घेणार पण आपल्याकडे तशी तयारी आहे का?

**गजानन भोईर :-**

माहितीच्या अधिकाराखाली प्रश्न विचारला की, नगरसेवकांच्या निधीची माहिती मिळाली पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तेच कशाला, नगरसेवकांचे भरलेले फॉर्म आहेत तेही मागितलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलू इच्छिते की, एवढेच सांगेन की, या विषयावरच चर्चा झाली आणि माझा एक महत्वाचा मुद्दा मी सांगितला. बरेचसे बिल्डर आणि मालक असे आहेत की, त्या बिल्डरच्या नावाखाली त्यांचे स्वतःची प्रॉपर्टी इन्व्हेस्ट करुन ठेवलेली आहे आणि त्यांनी कित्येक वर्षाचा टॅक्स भरलेला नाही आणि बाकीच्या सदस्यांनीही ह्या विषयी कळकळ व्यक्त केली की, या विकासासाठी आपले जे येणे आहे ते वसुल व्हायला पाहिजे. आपण आठ-दहा दिवसापूर्वी काही पदवीधर आपल्याकडे भरले आणि मला असे वाटते की, ते जास्तीत जास्त टॅक्समध्ये भरले आहेत. आपल्याला विनंती राहील की, मी दोन वर्ष या सभागृहात बघितले की, नेहमी घरपट्टीवरच जास्त चर्चा होते आणि वसुलीवरच जास्त चर्चा होते. तर ह्यावर्षी तरी किमान चांगल्यात चांगली वसुली व्हावी या हिशोबाने आपण तसे निर्देश द्यावेत.

**रतन पाटील :-**

विजय पाटील साहेब, महासभेमध्ये उपस्थित झालेला विषय मोबाईल्स टॉवर्सवर कर आकारणी करा. ती आकारणी झाली का? किती मोबाईल्स टॉवर्सवर आकारणी झाली आहे आणि किती वसुली झाली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कर आकारणी पेक्षा त्या ठिकाणी विकासकर वसुल करण्याचा मुद्दा होता.

**रतन पाटील :-**

मोबाईल टॉवरचे परवानगी शुल्क आणि कर आकारणी.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी म्हटले होते की, शेकडो टॉवर्स आहेत.

**रतन पाटील :-**

आहेत ना. आपण ते शोधा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य लेखी माहिती द्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपल्या जवळ जर अशी माहिती असेल तर आपण ती माहिती आपल्या नगररचना विभागाच्या अधिकाऱ्याला दिली तर शहराच्या विकासात आणखीन भर पडेल.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, आपण ह्याच्यामध्ये सक्त मोडून टाकली. मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, सर्व्हे करतो आणि त्याचा सर्व्हे करत नाही. मी माझी माहिती देतो ना. अधिकाऱ्यांनी सुध्दा जावे. ती बिल्डींग कुठे आहे? काय आहे ते मी द्यायला पाहिजे. मी अधिकारी नाही. अधिकारी जागेवर जाऊन कुठल्या बिल्डींगमध्ये काय आहे ते त्यांनी सर्व्हे करायला पाहिजे. मी फक्त सांगून होणार नाही.

**मा. सभापती :-**

आपले नांव होईल.

**रतन पाटील :-**

नाव नको. फक्त महापालिकेचे उत्पन्न वाढू द्या.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, घोडबंदर येथे टॅक्स भरला नाही म्हणून एक प्रॉपर्टी सील केली होती. श्री. चिंतामण नामदेव वैती असे नांव आहे आणि आज त्याच प्रॉपर्टीमध्ये पिठाची गिरणी सुरु झालेली आहे. त्याला परवानगी कोणी दिली? माझ्या माहितीप्रमाणे पाच वर्षापासूनचे टॅक्स बाकी आहे. त्याच्यावर अजुनपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. बरेचसे शेडसृ, तबेले वगैरे बांधले आहेत. श्री. दिलीप बाबर असताना त्यांनी स्वतः तिथे पाहणी केली होती. प्रॉपर्टी सिल केलेली आहे म्हणून मला सांगत होते. आज त्याच प्रॉपर्टीमध्ये पिठाची गिरणी सुरु झालेली आहे. ओम साई फ्लॉवर मिल. हे कसे काय? कुठल्या पध्दतीने त्यांना परमिशन कोणी दिली? महापालिकेची परवानगी घेतली का? महापालिकेने एन.ओ.सी. दिलेली आहे का? आणि त्याने टॅक्स भरले आहे का? ह्याचे मला उत्तर द्या.

**विजय पाटील :-**

आपण मला दहा मिनिटांचा वेळ द्या. मी ते तपासून आपल्याला माहिती सांगतो.

**सुर्यकांत भोईर :-**

उपायुक्त साहेब, ज्यांनी परवानगी दिलेली असेल व त्यांचे टॅक्स भरायचे बाकी असेल व ज्याने सिल मारली असेल व ज्या अधिकाऱ्याने त्याला परवानगी दिली असेल त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. आयुक्त, भिवंडी - निजामपुर महानगरपालिकेचे लवाद म्हणून कामा करावे असे महापालिकेने निर्देश दिले होते. मान्यता दिली होती आणि त्यांनी जर त्यांना परवानगी दिली नसेल तर मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग हे लवाद म्हणून काम करावे. या मा. महासभेच्या मान्यतेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून भिवंडी महानगरपालिकेचे आयुक्त ह्यांना प्रस्ताव सादर केला असता. आयुक्त साहेबांनी त्यांना कामाची म्हणजे त्यांच्या कामामध्ये व्यस्तपणा आणि तेच ठेकेदार डायरेक्ट किंवा इनडायरेक्टली त्यांच्याकडे असल्यामुळे अनुमती दिली नाही म्हणून तो प्रस्ताव प्रधान सचिव ह्यांच्याकडे सादर केलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्यावर प्रगती काय?

**जयंत पाटील :-**

आपण त्या ठेकेदाराला बोलावले होते. स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी त्या ठेकेदाराला बोलावले आणि ते आपल्याच केबीनमध्ये आले चर्चा झाली आणि त्यांनी आपाल्याला हेही सांगितले की, पॉझीटीव्हली तुमच्या बाजुने आहे. त्याच्यानंतर काय प्रगती झाली?

**गजानन भोईर :-**

९९ टक्के करतो म्हणून सांगितलेले आहे.

**डॉ. रमेश जैन :-**

१०० टक्के करतोच आहे.

**जयंत पाटील :-**

त्याचे भागीदार आले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जकात नियोजकाचा ज्यावेळी आपल्याकडे विषय होता. ॲन्टी चेंबरमध्ये सन्मा. सभापतींच्या अध्यक्षतेखाली आपली अनऑफिशियली बैठक झाली होती. त्या अनुषंगाने जे कामकाज करणे अपेक्षित होते. बैठका घेऊन त्याच्यातुन प्रयत्न करून त्यांनी केस विड्रॉव्हल करावी अशी आपली सर्वांची अपेक्षा होती. सामोपचाराने त्या पध्दतीने कार्यवाही केल्यास प्रशासन कधीही तयार आहे. त्या संबंधित ठेकेदारांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करायला पाहिजे. आपण अनऑफिशियली सामोपचाराने धोरण निश्चित केले होते. त्यामुळे आम्हाला काही रेकॉर्डवर घेता येत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

एप्रिल, मे, जुन, जुलै चार महिने झाले या चार महिन्यामध्ये काहीच कार्यवाही केलेली नाही का?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण सांगा की, अडचणी कुठे आल्या आहेत?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपले असे ठरले होते की, ऑक्ट्रॉयसाठी आपण आपली समिती गठित करावी, त्याचे काय झाले? ऑक्ट्रॉयचे काही प्रॉब्लम्स असतात. त्यासाठी आपण नगरसेवकांची कमिटी फॉम करुया असे ठरले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मार्गस्थ दाखल्यासाठी आपल्याकडे नुकतेच नॅशनल हायवेचा जो मुख्य रस्ता आहे. त्या रस्त्यावरुन अमन-गमन चालू आहे. त्या अनुषंगाने आवश्यक ते मार्गस्थ दाखले वसुलीसाठी जी फॅसिलीटी डेव्हलप करायला पाहिजे होते. तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हा प्रस्ताव दिलेला आहे हे मी मागच्या सभेत सांगितलेले होते. तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे असे म्हणणे आहे की, नॅशनल हायवेची अजून त्यांना परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे ती बाब प्रलंबित आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, नगररचना विभागाचे असे म्हणणे आहे की, सगळी प्रोसिजर ओके झालेली आहे आणि आपल्याला परवानगी ही मिळालेली आहे. असे शहर अभियंता ह्यांचे म्हणणे आहे.

**गजानन भोईर :-**

ही चांगली गोष्ट आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे कार्यकारी अभियंते आहेत आणि शहर अभियंता ह्यांनी सांगितलेले ते चुकीचे असणार का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण जे काही सांगत आहात त्याप्रमाणे दाखवून द्या की, जी काही परवानगी मिळालेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

खांबित साहेब, हायवेबद्दल मी साहेबांबरोबर बोललो. त्यावर साहेब बोलले की, त्याला मी माझे कव्हरिंग लेटर देतो आणि त्याच्यानंतर आपण दिल्लीपर्यंत जाऊन ते करुन आणि म्हणून बोलले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तोपर्यंत

**दिपक खांबित :-**

हा एम.आय.डी.सी.चा आहे ना, तिथे आपले काम चालू आहे. त्यांनी सेंटरच्या समोरचे जे काम आपण केले होते तेव्हा ते काम थांबवले आणि एम.आय.डी.सी.च्या येथे काम सुरु आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खांबित साहेब, आपल्याकडे दोन रस्ते आहेत. एकतर अमर पॅलेसला लागून एक रस्ता आहे आणि एक रोड अपोझिट साईडला तोही आपलाच रस्ता आहे. म्हणजे आपल्याला ते दोन्ही रस्ते मिळाले तरी आपला हा प्रश्न निघून जाईल.

**दिपक खंबित :-**

मिरा रोडवरुन पुढे पुढे येऊन एम.आय.डी.सी.ला टर्न मारायचे सर्व्हिस रोडवरुन पुन्हा बाहेर यायचे. तिथे काम सुरु आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

समजा, आपल्याला जर सेंटरिंगला प्रॉब्लेम येत नाही व आपल्याला जर जागा कमी असेल तर आपण ती पुढे करु या ना. इन्कमिंग होईल ना. लेफ्ट साईडला रस्ता आहे ना. स्टेट बँकेच्या समोर जो रस्ता आहे

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नॅशनल हायवेचे जे धोरण आहे. एकदा टोल लावल्यानंतर त्याचे काही डिस्टन्स आहे त्या डिस्टन्सच्या आत परत कोणताही टोल लावला जाणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा जो टोल लावला होता तो ठाण्याच्या हद्दीमध्ये होता. तो तेथून हलवला आणि आपल्याकडे आला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अशा पध्दतीने जी कार्यवाही होते. त्याच भागात आपल्याला कार्यवाही करता येते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, एकाच ठिकाणी दोन टोल लावला जातो.

**सुर्यकांत भोईर :-**

पूर्वी नगरपालिका असताना तो टोल लावला होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

संबंधित विभाग मा. महासभेसमोर वाढीव प्रस्ताव करण्यासाठी सादर करणार आहे.

**प्रकरण क्र ६४ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. ६६ :-**

माहे एप्रिल २००६ ते माहे जून २००६ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सादर करणेंत आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवुन आजची सभा सन २००६/०७ च्या पहिल्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६५ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, २२२ चे काय झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याची माहिती दिली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

माहिती दिलेली नाही. सन १९९८ ला परवानगी दिलेली आहे. पण ॲक्चुअली २००५ मध्ये परवानगी दिलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

उप-आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर ह्यांनी प्रश्न विचारला आहे की, मागे संक्रमण शिबीरसाठी १९९८ ला परवानगी दिलेली होती. त्यांच्या पत्रानुसार आपण २००४-०५-०६ ला परवागी दिलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांची ॲग्रीमेन्ट मागितलेली आहे. ज्याची संपूर्ण पेपरसेटसह माहिती मागितलेली आहे. ती माहिती अद्याप आमच्याकडे आलेली नाही. सन २००६ मध्ये परवानगी दिलेली आहे. महसुल क्रमांक १ ते ........

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने ह्या विषयाबाबत खुलासा करतो की, मागच्या दोन सभा कामकाजामध्ये हा विषय आलेला आहे. सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांनी या ठिकाणी थोडा प्रयत्न केला होता. या विषयाच्या अनुषंगाने वस्तुस्थिती निदर्शनात येण्याच्या बाबतीत, वस्तुस्थिती अशी आहे की, संक्रमण शिबीर आणि हाऊसिंग फाय डिसहाऊसिंग हे दोन विषय आपण एकत्र करत आहोत ही वस्तुस्थिती आहे. हाऊसिंग फाय डिसहाऊसिंग हा जो रिझर्व्हेशन आहे. हा संक्रमण शिबीर ही बाब होऊ शकेल पण त्याचा बेसिक कन्सेप्ट हा शहराच्या विकास योजनेमध्ये जे आरक्षण आहे ते आरक्षण डेव्हलप करण्यासाठी लोकांची जी बाधा येणार आहे त्यांना रि-सेटलेमेन्टसाठी हाऊसिंग फाय डिसहाऊसिंग असे सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांनी मान्य केले होते आणि डी.सी. रुल अपेक्षित आहे, तर त्या अनुषंगाने जास्तीची माहिती, आपल्याला ९७ फ्लॅट येण्याच्या उद्देशाने प्रशासनाने ती माहिती दिली होती की, अशा माध्यमातुनसुध्दा आपल्याकडे ह्या मालमत्ता आहेत. कदाचित त्याचा परमनन्ट वापर होणार नाही. पण टेम्पररी काळासाठी सुध्दा आपण वापर होण्यासाठी त्या फॅसिलीटी आपल्याकडे उपलब्ध होत आहेत म्हणून ते निर्दशनात आणून देण्याचा प्रयत्न होता. पण संक्रमण शिबीरासाठी आपल्याकडे कोणतेही आरक्षण आरक्षित नाही. त्यासाठी आपल्याला नव्याने आरक्षण प्रस्तावित करावे लागेल किंवा आपल्याकडे ज्याकाही सार्वजनिक मालमत्ता आहेत त्याचे नियोजन ह्या संक्रमण शिबीरासाठी करावे लागेल. मा. आयुक्त साहेबांनी दि. ३१/०७/२००६ ॲडिशनल गोषवारा आपल्या समोर दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

संक्रमण शिबीराची आवश्यकता आहे हे बरोबर आहे. साहेबांचे म्हणणे बरोबर आहे अजून बरीचशी जागा त्याच्यात बाकी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन १९९८ ला दिलेली परवानगी योग्य आहे का? सन २००४ ला दिलेली परवानगी योग्य आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्व परवानग्या योग्य आहेत आणि सर्व परवानग्या ह्या नियमाच्या डी.सी. रुलप्रमाणे दिलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आम्हाला माहिती ही चुकीची दिलेली आहे. त्यावेळी त्यांना विचारले तेव्हा बिल्डरचे नाव नाही, विकासकर्त्याचे नाव नाही. तेव्हा हे संपूर्ण डिटेलमध्ये ........

**सुर्यकांत भोईर :-**

डिटेलमध्ये माहिती दिलेली नाही. आर्कीटेक्टकडून जी माहिती आहे ती दिलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बांधकाम परवानगीची सर्व संचिता ह्या ओपन असताना आणि आपल्याला त्या पर्सनलीसुध्दा पाहता येतील. ते ओपन डॉक्युमेंट आहे. परवानगीची सगळी माहिती आपल्याला कलेक्ट करता येईल. सर्व माहिती ह्या डी. सी. रुल्स मंजूर अंतर्गत दिलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदरची संपूर्ण माहिती ह्या असे कित्येकदा पत्र ही दिलेले आहे. दि. ११/७/२००६ ला पत्र दिले त्याच्यानंतर आपल्या सभेत विषय घेतला असे मला वाटते. तर त्यांना ही सर्व माहिती पाहिजे ना. विकासकर्त्याचे नाव देखील माहिती नाही. आर्किटेक्टचे नाव ॲड करुन दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

२२२ मध्ये आरक्षण क्र. २५२ मध्ये साडे सहा हेक्टर जागा अजून बाकी आहे. ते आपण संक्रमण शिबीरासाठी आरक्षित करुन घ्या. बाकीच्या जागेवर आपण काही बांधू शकत नाही.

**जयंत पाटील :-**

आज त्या जागेवर काय पोझिशन आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

सद्यस्थिती काय आहे?

**दिलीप घेवारे :-**

सद्या जागा मोकळी आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्याला सद्या संक्रमण शिबीराची अतिशय आवश्यकता आहे. कारण आपल्याकडे इमारती पडलेल्या आहेत काही लोक दुसरीकडे रहात आहेत आणि त्यामुळे मोठा प्रॉब्लेम निर्माण होणार आहे. एक ही जागा खाली असेल तर आपण हे कॅन्सल करुन टाका आणि आपण मा. महासभेत हा विषय घेऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

सन्मा.सदस्य जयंत पाटील आपण ठराव मांडा, मी अनुमोदन देतो आपण हा विषय मा. महासभेत घेऊ.

**प्रेमनाथ पाटील :-**

महापालिका ती जागा स्वखर्चाने बांधेल. जो काही खर्च आहे तो, महानगरपालिका उचलेल नाहीतरी आपण रस्ते बांधण्यासाठी करोडो रुपये खर्च करतो.

**सुर्यकांत भोईर :-**

रस्ता बांधकामासाठी आपण पंधरा-वीस करोड रुपये घेऊ शकत नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

डी.सी. रुलमध्ये ज्या सहा परवानग्या दिलेल्या आहेत. त्या देऊन सुद्धा खुप मोठ्या प्रमाणात जागा शिल्लक आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण मा. महासभेसमोर हा विषय आणा.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण म्हणता की जागा शिल्लक आहेत, ते आपण दाखवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

म्हणून मा.महासभेसमोर विषय आणता येईल, काही प्रॉब्लेम नाही. उर्वरीत रिझर्वेशनमध्ये ज्या जागा आहेत. संक्रमण शिबीरासाठी वापरण्यासाठी आपल्याला करावे लागेल मग त्या अनुरुप प्रस्ताव आणता येईल, त्याला काही प्रॉब्लेम नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण ज्या ज्या परवानग्या दिलेल्या आहेत.....

**सुर्यकांत भोईर :-**

त्या परवानग्या रद्द करण्यात याव्यात.

**जयंत पाटील :-**

संपुर्ण जागेची परवानगी दिली असेल.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

संपुर्ण जागेची परवानगी कुठे दिलेली आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण बोललात ना संपुर्ण जागेची परवानगी दिलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

एकूण आरक्षण किती आहेत आणि परवानगी दिलेली अरक्षणे किती आहेत हे आपण गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

१२२ मध्ये काम चालू आहे त्या संदर्भामध्ये चर्चा चालू आहे ना.

**रतन पाटील :-**

साहेब, क्षेत्रफळ दिले आहे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

फार कमी जागेमध्ये आपण परवानगी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

पण क्षेत्र कुठे दिलेले आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

क्षेत्र दिलेलेच नाही ना.

**दिलीप घेवारे :-**

त्याच्यामध्ये दोन आरक्षण आहेत. २२२ सर्व्हे ४ हेक्टर ६५ आर आहे. त्याच्यामध्ये आपण १ हेक्टर ६५ आर ला आपल्याकडून बांधकाम परवानगी दिलेली आहे. तिथे आता ३ हेक्टर जागा शिल्लक आहे आणि दुसरे जे साडे पाच हेक्टर जागा आहे, २२२(अ) मध्ये त्याच्यात ७० टक्के जागा सी. आर. झेड. ने बाधीत आहे.

उरलेली अजून जागा शिल्लक आहे. तिथे दोन हेक्टर असे चार ते पाच, सुमारे चार हेक्टर जागा शिल्लक आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

म्हणजे परवानगी दिलेली नाही.

**दिलीप घेवारे :-**

नाही आणि काही क्षेत्रामध्ये पुर्वी प्लॅन पास झालेले आहेत. त्याच्यामध्ये परवानगी द्यावी लागेल आणि प्लॅन पास झाल्यावर डेव्हलपमेंट चार्ज घेतला असता ना. तरीसुद्धा....

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण डेव्हलपमेंट चार्ज किती घेता? आज मिरा भाईंदर शहरामध्ये एवढ्या बिल्डिंग झालेल्या आहेत. तर किती डेव्हलपमेंट चार्ज जमा व्हावा?

**सुर्यकांत भोईर :-**

मा.महासभेमध्ये तुम्ही हा विषय आणला पाहिजे होता ना.

**दिलीप घेवारे :-**

कशाकरिता?

**सुर्यकांत भोईर :-**

हा धोरणत्मक विषय नाही का? मिरा भाईंदरमध्ये शंभराच्या वर धोकादायक इमारती आहेत.

**दिलीप घेवारे :-**

१९९८ साली धोरण निश्चित झालेले आहे. त्यानंतर आपण दोन वेळा डी. सी. रुल्सला मंजूरी दिली २००४ आणि २००५ ला, त्यावेळेस हा विषय क्लिअर कट आलेला आहे ते आपण वाचा. त्यात लिहिले आहे की, कसे स्पॉट विकसित करायचे त्याच्यासाठी काय करायचे? कमिशनर साहेबांच्या परवानग्या घ्यायच्या आहेत.  आयुक्तांनी परवानगी दिली म्हणून आपण येथे विषय आणतो आणि रद्द करा असे म्हणतो, रद्द केल्यानंतर त्याचा जो खर्च झलेला आहे, ही किंमत आहे ते आपण त्यांना देणार आहात का?

**सुर्यकांत भोईर :-**

ऐंशी करोडचे आपण डी. पी. रस्ते दाखवणार होतो. त्या बिल्डर लोकांना रोड पॅलेस देतो तर तो खर्च आपण करु शकत नाही का?

**प्रेमनाथ पाटील :-**

बिल्डरचे काम काय आहे? रस्ते, गटार बनवणे हे बिल्डरचे काम आहे का, नाही?

**सुर्यकांत भोईर :-**

बिल्डरचे काम आपण करुन देतो ना.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ती जागा किती आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

साडे चार एकर.

**जयंत पाटील :-**

साहेब, धोकादायक इमारती किती आहेत?

**दिलीप घेवारे :-**

घोडबंदरची आपली जी चार-साडेचार हेक्टरची जी सरकारी जागा होती.  आपण २००२ पासून संक्रमण शिबीरासाठी ती जागा मागत आहोत. तो पत्रव्यवहार माझ्याकडे आहे.

**केशव घरत :-**

साहेब, ती जागा झोपडपट्टीवासियांसाठी दिलेली आहे ना.

**दिलीप घेवारे :-**

पुन्हा आपण वाल्मिकी आंबेडकर योजनेसाठी ती जागा घेतली.

**रतन पाटील :-**

पोलिस मुख्यालयासाठी ती जागा  केलेली आहे. हे मिरा भाईंदरमध्ये होत आहे ते चांगलच आहे ना.

**दिलीप घेवारे :-**

ती गर्व्हमेंट लॅन्ड आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

गर्व्हमेंट लॅन्ड आहे, पण खाजगी आपण त्यांना....

**रतन पाटील :-**

टी.डी.आर. देऊ ना.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, तंबू बांधल्यामुळे त्यांना तात्पुरती सोय करता येईल.

**जयंत पाटील :-**

आपण हा गोषवारा दिलेला आहे. त्यात अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे महानगरपालिकांच्या शाळा, समाजमंदिरामध्ये सुद्धा जागा उपलब्ध राहिल आणि ह्याच्यामध्ये आपण होमगार्ड ठेवा असे सांगत होतो. आपण एका ठिकाणी होमगार्डसाठी जागा द्या आणि या गोषवाऱ्यामध्ये सांगता की, आमच्याकडे जागा नाही. आपणच म्हणता होता की, होमगार्ड वाल्यांना राहायला जागा द्या आणि या गोषवाऱ्यामध्ये शाळामध्ये जागा नाही हे आपण मान्य करतो हा गोषवारा खरा आहे.

**केशव घरत :-**

सभापती, महोदय, हा विषय मा. महासभेसमोर ठेवा.

**जयंत पाटील :-**

मा. महासभेने निर्णय घ्यावा.

**सुर्यकांत भोईर :-**

सदरचा हा विषय मा. महासभेपुढे जाऊ द्या.

**गजानन भोईर :-**

महत्त्वाचा मुद्दा असा की, सर्वात पहिला हा विषय कोणी आणला?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण मागणी केली.

**गजानन पाटील :-**

या विषयाची आपण मागणी केली, तर आपण मागणी का केली होती तर हा संक्रमण शिबिर लांबलचक तंबूमध्ये....

**सुर्यकांत भोईर :-**

पहिल्यांदा जागा बघा. ह्या आरक्षित जागेमध्ये त्यांनी बांधकामाची परवानगी दिलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण हे जे आरक्षण दिलेले आहेत ते आरक्षण कसे काय दिलेले आहेत?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य तंबूचा अर्थ काय? जर एखादी बिल्डिंग कोसळली तर त्यांना कायम स्वरुपी बिल्डिंगमध्ये जागा द्यायची नाही. येथे जो विषय आलेला आहे, श्री. घेवारे साहेब आपण ऐकून घ्या....

**सुर्यकांत भोईर :-**

तेच तर आपण ठरवायचे आहे ना.

**मा. सभापती :-**

आपण तात्पुरती शेड्स बांधू. या त्याच्यात त्यांना एक दिवसासाठी तरी राहता येईल ना.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण जे बोलता तसे बांधायला घेतले आहे ना. ९७ फ्लॅट मग तुम्ही कशासाठी घेतले आहेत, ते आम्हाला सांगा. कुठला रस्ता आता बाकी आहे ते आपण सांगा?

**मा. सभापती :-**

अनेक रस्ते बाकी आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

कुठले रस्ते आहेत ते आपण सांगा ना.

**जयंत पाटील :-**

मी आपल्याला सांगू इच्छितो. आपले काही रस्ते बी. पी. रोड आह, नवघर रोड आहे तिथे जे अरुंद रस्ते आहे तिथे जर तुम्हाला रूंदीकरण करायचे असेल तर त्या इमारती बाधित होतील. त्यांच्यासाठी आऊटपुट सुचवले, ते त्यांच्यासाठी आहे. महापालिकेच्या प्रकल्पामुळे ते बाधित होतील. असा विषय आहे.

**मा. सभापती :-**

आणि धोकादायक इमारतीसाठी आपल्या शेड्स बांधायचे आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब, महानगरपालिकेने धोकादायक इमारत जाहिर केलेली आहे आणि तरी त्या लोकांनी ती इमारत खाली केलेली नाही त्यामूळे ती आपली जबाबदारी होत नाही . आपण त्यांना सांगितलेले आहे की तुम्ही इमारत खाली करा ही बिल्डींग कोसळणार आहे आणि तरी ते जात नसतील तर त्यांच्या राहण्याचा बंदोवस्त आपण करायचा का?

**मा. सभापती :-**

ती बिल्डिंग जेव्हा कोसळेल त्याच्यासाठी बोलत आहे. अचानक ती बिल्डिंग कोसळली....

**जयंत पाटील :-**

ती इमारत कोसळणार म्हणूनच आपण नोटीस दिलेली आहे ना.

**मा. सभापती :-**

म्हणूनच त्यासाठी आपल्याला शेड्स बांधायचे आहे.

**गजानन भोईर :-**

त्यांना आपण नोटीस दिलेली आहे ना आणि तुम्ही किती जणांना त्यात राहायला जागा देणार आहात.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, आता सांगता की सिक्युरिटी गार्ड नको. आता हे कंपनी ईश्यू आलेला आहे, पोलिस का एवढा बंदोबस्त देणार आहे.

**गजानन भोईर :-**

आपण त्यांना जागा कुठे देणार आहोत?

**केशव घरत :-**

सभापती महोदय, हा विषय मा. महासभेसमोर घ्या ना.

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय मा. महासभेसमोर आलाच नाही.

**दिपक खांबीत :-,**

या ठरावाची शिफारस मा. महासभेपुढे करु.

**केशव घरत :-**

ठराव वाचू का?

**सुर्यकांत भोईर :-**

ज्या बिल्डरचे काम चालू आहे त्याची परवानगी रद्द करा.

**केशव घरत :-**

प्रकरण क्र. ६५, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांसाठी आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबिराची व्यवस्था...

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य, आपल्याला शेड्स बांधायचा आहे तो विषय आपण पास करा.

**दिपक खांबीत :-**

तो विषय देखील मा. महासभेत पास करा.

**मा. सभापती :-**

कशासाठी? मा. महासभा होता होता जर एखादा प्रसंग आला तर ?

**रतन पाटील :-**

आपण शेड्स तर बांधणार आहोत.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, आपण कुठल्या जागेमध्ये बांधणार? कुठल्या आरक्षणामध्ये बांधणार?

**मा. सभापती :-**

कुठल्यातरी आरक्षणामध्ये करु.

**गजानन भोईर :-**

कुठल्या आरक्षणामध्ये ?

**सुर्यकांत भोईर :-**

कुठल्या आरक्षणामध्ये? जे आरक्षण आहे त्या आरक्षणामध्ये पास केलेले आहे. परवानगी दिलेली आहे.

**दिपक खांबीत :-**

आपल्या ताब्यात जे आरक्षण आहेत ना.

**गजानन भोईर :-**

आहेत ना. मग त्याच्यासाठी ठराव मांडा.

**केशव घरत :-**

मा. महासभेत येऊ द्या.

**दिपक खांबीत :-**

मा. महासभा ठरवेल ना.

**गजानन भोईर :-**

सगळं, ना. महासभा ठरवेल.

**जयंत पाटील :-**

आपण सदस्या विषय मा. महासभेसमोर पाठवत आहोत आणि त्याचे धोरण अजून ठरवायचे आहे ते सर्व मा. महासभाच ठरवेल.

**केशव घरत :-**

प्रकरण क्र. ६५ चा सभागृहासमोर ठराव मांडला.

**सुर्यकांत भोईर :-**

अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ६५ मंजूर.

**प्रकरण क्र. ६५:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांसाठी आपत्कालिन परिस्थितीत तात्पुरत्या स्वरुपात राहण्याकरिता संक्रमण शिबिराची व्यवस्था करणेबाबत. (दि. २८/७/२००६ रोजीचे तहकूब प्रकरण क्र.६२)

**ठराव क्र. ६७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत धोकादायक इमारतीमधील रहीवाशांची तात्पुरती व्यवस्था प्रशासनाने ताब्यात असलेल्या आरक्षणाच्या अथवा इतर जागावर तंबू उभारुन संक्रमण शिबिर तयार करावे. तात्पुरत्या संक्रमण शिबिरा ठिकाणी पाणि, विज, बाथरुम शौचालयाची सुद्धा व्यवस्था करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर कामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच विकास आराखड्यात संक्रमण शिबिराचे आरक्षण दर्शविण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम ३७ नुसार प्रशासनाने कार्यवाही प्रस्तावित करावी. सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. ६६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही दरपत्रक जोडा. परंतु, तुम्ही हा प्रस्ताव प्रशासकीय काळात असल्याबाबत बोलत आहात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

प्रशासकीय काळात नाही. आपण प्रशासकीय काळामध्ये एजन्सी नेमलेली होती.

**केशव घरत :-**

परंतु, सन २००२ मध्ये आठव्या महिन्यातच बॉडी आली.

**सुर्यकांत भोईर :-**

आठव्या महिन्यानंतर महापालिका स्थापन झाली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण त्यावेळेला चर्चा केली असेल.

**सुर्यकांत भोईर :-**

दि. २८/८/२००२ला महापालिका स्थापन झाली. या ठिकाणी दि. २९/११/२००२ रोजी मंजुरी प्राप्त आहे असे लिहलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

तुमचा नक्की काय प्रश्न आहे? ते सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

दरपत्रकाला दि. २९/११/२००६ रोजी मंजुरी दिलेली आहे. ही मंजुरी प्रशासकीय काळात म्हणजेच महापालिकेची निवडणूक झाल्यानंतर पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मिळालेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

महानगरपालिकेची निवडणूक झाल्यानंतर पहिल्याच वेळेला ही मंजुरी मिळालेली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ह्याचे जे मंजुर रेट ठरवलेले होते. तेच रेट मंजुर केलेले आहेत.

**केशव घरत :-**

या ठिकाणी ज्या तारखा दिलेल्या आहेत त्या बॉडी स्थापन झाल्यानंतरच्या तारखा आहेत का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

याला आज मंजुरी दिलेली आहे. परंतु, अवलोकनाला नंतर दिलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठिकाणी दि. २६/८/२००२चा ठराव आहे.

**प्रभात पाटील :-**
तुम्ही वर्क ऑर्डर कशी दिली?
**ग्रिटा फॅरो :-**
पत्र आले तेव्हा वर्क ऑर्डर दिली.
(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. १६९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)
**सुर्यकांत भोईर :-**
ती लोक आपल्याला कमी उत्पन्न दाखवतात. परंतु, उत्पन्न आहे त्याच्यापेक्षा कमी होत चाललेले आहे.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**
येत्या सप्टेंबरमध्ये त्यांची पाच वर्षाची मुदत संपत आहे. फक्त ही न्यायालयीन संरक्षणाची बाब आहे.
**केशव घरत :-**
साहेब, असे किती जाहिरातदार आहेत? ज्यांची मुदत पाच वर्षांनी संपते.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**
बहुतेक सर्व जाहिरातदारांची मुदत पाच वर्षांनी संपते.
**ज्युडी डिसोझा :-**
असे नऊ-दहा जण आहेत.
**रतन पाटील :-**
असे एकूण दहा जण आहेत.
**सुर्यकांत भोईर :-**
होर्डिंगची वसुली कमी होईल ना.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**
आपल्या महापालिकेतर्फे हेर्डिंगची वसुली होईल.
**सुर्यकांत भोईर :-**
पानपट्टे साहेब, होर्डिंगची जी वसुली आहे ती वसुली कमी होईल का?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**
सहा-सहा महिन्यासाठी दिली होती. आता पुढच्या महिन्यात ती रक्कम वसुल होईल.
**जयंत पाटील :-**
आता आपल्याकडे बॅलेन्स किती आहे?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**
साहेब, गेल्या वर्षी जाहिरातची फी बजेटमधून वसुल केली आपली त्याची वसुली दरवर्षी होत असते.
**जयंत पाटील :-**
साहेब, तुमच्या दरपत्रकामध्ये याची शिल्लक दाखवली आहे. दरपत्रकामध्ये शिल्लक दाखवली आहे याचा अर्थ त्यांनी वेळेत दिलेली नाही.
**ग्रिट फॅरो :-**
एवढ्यांची बिल शिल्लक आहे.
**जयंत पाटील :-**
एवढ्यांची शिल्लक राहिलेले आहे का?
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**
दि. ३०/६/२००६ ची आहे. त्यासाठी आपण एक महिना लावलेला आहे.
**केशव घरत :-**
मग आता संपूर्ण वसुली झालेली आहे का?
**रतन पाटील :-**
बसचे जे खांबे आहेत त्याच्यावरच्या जाहिरात कोणाकडे आहे?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**
बसच्या खांब्याबाबतची जाहिरात परिवहन विभागाकडे आहे.
**रतन पाटील :-**
परंतु, होर्डिंग आपल्याकडे यायला पाहिजे.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**
साधारणतः १७५ पी.सी. त्यांनी उपलब्ध करुन द्यायचे आहेत. म्हणजे २९ स्लॅबने आपण तयार करतो. त्यामधला जो हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर आहे ते संबंधित ठेकेदार प्रोव्हाईड करणार आहेत आणि त्यासाठी लागणारा जो ऑपरेशन खर्च आहे तो खर्च ठेकेदार करणार आहेत. आणि त्यासाठी जो शिक्षक वर्गाचा पगार आहे किंवा शिपाई आहेत त्यांचा सर्व खर्च ठेकेदार करणार आहेत.
**जयंत पाटील :-**
आपण त्यासाठी जागा उपलब्ध करुन द्यायची आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

आपण त्यासाठी जागा उपलब्ध करुन द्यायची आहे आणि स्ट्रक्चर उभे करुन द्यायचे आहे.

**रतन पाटील :-**

स्ट्रक्चर ठेकेदार बांधणार आहे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

आपण स्ट्रक्चर बांधणार आहोत.

**रतन पाटील :-**

मागच्या वेळेला ठेकेदाराने स्ट्रक्चर बांधलेला होता.

**केशव घरत :-**

प्रत्येक शाळांमध्ये रुम तयार झालेले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

स्ट्रक्चर आपण बांधणार आहोत आणि त्याप्रमाणे कार्यवाही प्रगती पथावर आहे आणि ही इंटरनल लॅबची व्यवस्था आहे. ते काम ठेकेदार करणार आहेत आणि त्याचा ऑपरेशन मेन्टनन्ससुध्दा ठेकेदार करणार आहेत. आणि शिक्षकही त्यांचेच असतील त्याप्रमाणे त्या कर्मचारी वर्गाचा पगारही त्यांच्याकडूनच असेल त्यात आपला काहीही हस्तक्षेप राहणार नाही.

**केशव घरत :-**

कोणत्या इयत्तेपासून आपण शिक्षण देणार आहोत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

नर्सरीपासून शिक्षण देणार आहोत. म्हणजे ज्याप्रमाणे आपले स्कुल आहेत त्याप्रमाणेच.

**केशव घरत :-**

आता मा. पुरके साहेबांनी आठ परिक्षा घ्यायचे असे सांगितले आणि त्यात तुम्ही हे आणखीन ओझं देता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

अहो साहेब, या परिक्षा राहणार नाहीत.

**केशव घरत :-**

पण साहेब हा शिक्षणाचा भागच आला ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

फक्त एक तास राहणार आहे.

**केशव घरत :-**

ही पहिली गोष्ट आणि दुसरी गोष्ट अशी की तुम्ही लक्षात घ्या. तुम्ही त्याला ३५ रुपये चार्ज लावले आहेत. पर विद्यार्थी ३५ रुपये चार्ज लावलेले आहे आणि ते चार्जेस पर मंथ असे राहिले तर ते विद्यार्थी पुढच्या वर्षी आपल्या शाळेतुन निघुन जातील. साहेब, ते गरिब विद्यार्थी आहेत.

**प्रभात पाटील :-**

साहेब, हे गरिब विद्यार्थी आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

साहेब, तेच मी सांगतोय. तुम्ही माझं पूर्ण ऐकूनच घेत नाही. हे जे विद्यार्थ्यांसाठी ३५ रुपये चार्ज लावले आहे ते महानगरपालिकाच खर्च करणार आहे. महापालिकेला २९ कॉम्प्युटर लॅब सोयीचे इन्फ्रास्ट्रक्चर आणि मॅनपॉवर जर त्याचा खर्च करणार असता तर तो कितीतरी आला असता आणि त्याचा मेन्टनन्स करणं वगैरे आणि त्याची आपली ॲसेस झाली असती. १० वर्षानंतर हा सर्व इन्फ्रास्ट्रक्चर जो होईल तो आपल्या मालकीचा होईल. ठेकेदाराची कन्सटल्सी ठेवायची की नाही महानगरपालिका निर्णय घेईल.

**रतन पाटील :-**

पगारवाढीच काय करायच?

**ज्युडी डिसोझा :-**

साहेब, आपण त्यांना हा करार १० वर्षासाठी करुन देणार आणि मधल्या काळात आपण त्यांच्या कामाशी सॅटीस्फाईड नसलो तर आपण काय करु शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

तर आपण त्यांना उडवू शकतो.

**ज्युडी डिसोझा :-**

त्यांना आपण डिस कन्टीन्यु करु शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

तसं रिन्यु करण्याचे अधिकार आपल्याला ॲग्रीमेन्टमध्ये ठेवायलाच पाहिजे.

**ज्युडी डिसोझा :-**

कारण माझ्या माताप्रमाणे त्यांना एवढा कालावधी देता कामा नये. जास्तीत जास्त ५ वर्षे द्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

१० वर्षे म्हणजे दोन टर्म झाले.

**ज्युडी डिसोझा :-**

१० वर्षे म्हणजे दोन टर्म होतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण कोणतेही योजलेले धोरण लॉंग टर्मचे असते. छोट्या लेव्हलवर बी.ई.ओ.टी. सक्सेस होत नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

पाच वर्षाचा कालावधी योग्य आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण पहिले ॲग्रीमेन्ट पाच वर्षाच्या कालावधीचे ठरवू या.

**जयंत पाटील :-**

१० वर्षे कालावधी योग्य आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

त्या ॲग्रीमेंटचा दहा वर्षाचा कालावधी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण संगणकाचे प्रशिक्षण फक्त महानगरपालिकांच्या शाळांना देणार आहोत ना.

**रतन पाटील :-**

आपण संगणकाचे प्रशिक्षण पहिली व दुसरीच्या वर्गांना द्यायचे की नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना वाचता येत नाही. त्यामुळे त्यांना संगणकाचे प्रशिक्षण देऊन काहीही फायदा नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण इयत्ता पहिली पासुनच्या विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देऊ शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण चौथीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड दिला तरी वाचु शकत नाहीत.

**रतन पाटील :-**

आपल्या महापालिकेतील विद्यार्थ्यांची अशी अवस्था आहे.

**जयंत पाटील :-**

त्या विद्यार्थ्यांनी कॉम्प्युटर हा शब्द बोलून दाखवावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

त्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरबाबत योग्य ती माहिती मिळण्यासाठी आपल्याला कॉम्प्युटरचे प्रशिक्षण द्यायचे आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, त्या विद्यार्थ्यांना ती बटणे दाबायची माहिती पाहिजे. त्या बटणांवर इंग्लिश अक्षरे असतील तर ती त्यांना समजली पाहिजेत.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ती मुले सक्षम असतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

बहुतेक वेळेला आपल्याला कॉम्प्युटर ऑपरेट करता येत नाही. परंतु, ही लहान मुले तो कॉम्प्युटर इजीली ऑपरेट करतात.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही रू. ५ करोडचे टेन्डर काढता. परंतु, याठिकाणी दैनिक गावकरी व सुरजप्रकाश हे काय पेपर आहेत का?

**जयंत पाटील :-**

तुम्ही प्रथम याबाबतची माहिती गोळा करा. तुम्ही टोकाची भुमिका घेऊ नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण प्राथमिक शाळेच्या चौथी - पाचवीच्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर देणे ही बाब काही मोठी नाही. कारण प्रायव्हेट शाळेतील विद्यार्थ्यांना अशा फॅसिलिटी नर्सरीपासुन दिल्या जातात. आपले विद्यार्थी समाजात मागे पडू नये हा या मागचा उद्देश आहे.

**जयंत पाटील :-**

आपण संगणकाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

कॉम्प्युटरची संख्या किती आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

कॉम्प्युटरची संख्या १७५ आहे. त्याच्यामध्ये प्रत्येक शाळेला पाच पी.सी. द्यायचे आहेत आणि पाच-सहा शाळांना पंधरा पी.सी. द्यायचे आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपल्याला त्याठिकाणी एक सेपरेट संगणक शिकवणारा ठेवावा लागेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

आपल्याला किती संगणक अपेक्षित आहेत? आपण त्याचा तक्ता दिलेला होता. आपल्याकडे त्या शाळांबाबत जे सुझाव असतील आपण त्याप्रमाणे हे ॲग्रीमेंट केलेले आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

फक्त महानगरपालिकेच्या शाळांनाच पी.सी. द्यायचे आहेत ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

होय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्या ठेकेदारांना बोलवा. आपल्याला महापालिकेच्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरचे प्रशिक्षण द्यायला पाहिजे. जेणेकरून आपण व्यवस्थित शिकवतो की नाही ते आपल्याला समजेल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही याठिकाणी ठेकेदाराचे रेट दाखवलेले आहेत. त्याच्यामध्ये आपल्याकडून एक ठेकेदार ३५/- घेतो आणि एक ठेकेदार रू. १२३/- मागत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

कॉम्प्युटरच्या क्वालिटीमध्ये फरक आहे की, अजुन दुसरे कारण आहे ते मला सांगा.

**ज्युडी डिसोझा :-**

हे सर्व पैसे कॉम्प्युटरचे प्रशिक्षण देण्यासाठी आहेत.

**जयंत पाटील :-**

ते कलर कॉम्प्युटर आहेत ब्लॅक ॲन्ड व्हाईट कॉम्प्युटर आहेत असे काही आहे का?

**रतन पाटील :-**

कॉम्प्युटरच्या साईझमध्ये फरक आहे का?

**प्रकरण क्र. ६६ :-**

महापालिका शालेय विद्यार्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण देणेकामी आलेल्या निविदेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. १८/४/२००६ ठराव क्र.५ अन्वये मान्यता दिल्याप्रमाणे महानगरपालिका शाळामध्ये संगणकीय शिक्षण देणे कामी दि. १४/७/२००६ रोजी दैनिक गांवकरी व दै. सुरजप्रकाश या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यांत आलेली होती. त्या अनुषंगाने एकूण पाच ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत. त्याचे दरपत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | कॉम्प्युटर करीयर क्लासेस | हार्डनेट कॉम्प्युटेक | पॅन्सी टेक्नॉलॉजी | ई-स्कुल इंडिया प्रा.लि. | सीस कॉम्प्युटर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महापलिका २९ शाळामध्ये विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे. प्रति विद्यार्थ्यामागे आकारण्यात येणाऱ्या मासिक फी चा दर | रु. ८६.४९ | रु. १२३.०० | रु. ३५.०० | रु. ४०.०० | रु. ४२.६२ (सरासरी) |

वरील प्रमाणे आलेल्या ठेकेदारांनी निविदामधील दराची अटीशर्तीनुसार छाननी केली असता पॅन्सी टेक्नॉलॉजी, कल्याण या ठेकेदाराचे दर सर्वात कमी असल्याने मे. पॅन्सी टेक्नॉलॉजी, कल्याण यांची निविदा स्विकारणेस ही सभा मंजुरी देत असून सदरकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार महानगरपालिकेने संबंधित शाळांमध्ये संगणक लॅब तयार करुन दिल्यानंतर ठेकेदार यांनी कामास सुरुवात करावयाची आहे. सदरकामी आवश्यक करारनामा करुन संगणक लॅबबाबत तातडीने कार्यवाही करावी. तसेच वेळोवेळी येणारे देयके अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६७ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

साहेब, दुसरा विषय बाजार लिलावाचा आहे. बाजार वसुलीचे रू. २७/- घेतात. फेरीवाल्यांकडून रू. २०/- वसुल केले जातात. तुम्ही या वसुलीबाबत किंवा रु. २०/- ची पावती छापायला सांगा. फेरीवाल्यांकडून रू. १५/- ते रू. २०/- पर्यंत वसुली केली जाते. एखादी नगरपालिका रू. २०/- ची पावती देऊ शकते का?

**मा. सभापती :-**

जर तुम्हाला अशी करताना आढळले तर तुम्ही आम्हाला दाखवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमच्याकडून रू. १५/- ची पावती बोलले तर रू. १५/- घेतले.

**गजानन भोईर :-**

जर महापालिका रू. २०/- घेत असेल तर त्या पावतीबाबत महापालिकेला ऑफिशियली जाऊ दे.

**विजय पाटील :-**

आपण आपल्या अटीशर्तीमध्ये तसे मेन्शन केलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, तुमच्या अटीशर्तीप्रमाणे अंमलबजावणी होत नाही.

**विजय पाटील :-**

दोन चौ. मी. पेक्षा जास्त जागा असेल तर त्यांच्याकडून बाझार वसुली करायची असे अटीशर्तीमध्ये मेन्शन केलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

जर बाझार वसुलीसाठी रू. १५/- घेण्याचे अधिकार असतील तर रू. १५/- घ्यायला पाहिजे. कारण बाझार वसुलीसाठी जास्त पैसे घेतले जात नाहीत असे मला वाटते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण बाजार वसुलीसाठी एक चौ. मी. ला वगैरे असे ठरलेले आहे का?

**विजय पाटील :-**

आपण एका चौ.मी. ला रू. १०/- घ्यायचे आहेत. दिड चौ.मी. असतील तर रू. १५/- घ्यायचे आहेत आणि दोन चौ.मी असेल तर रू. २०/- घ्यायचे आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याचा ठराव आहे का?

**विजय पाटील :-**

ठराव वगैरे केलेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, आता जो टोपली घेऊन बसलेला आहे त्याच्याकडून किती रूपये घ्यायला पाहिजेत?

**विजय पाटील :-**

आपण त्याच्याकडून रू. १०/- घ्यायला पाहिजेत.

**केशव घरत :-**

सकाळी रू. १०/- घेतात आणि संध्याकाळीसुद्धा रू. १०/- घेतात.

**सुर्यकांत भोईर :-**

दोन टाईम वसुली केली जाते.

**विजय पाटील :-**

त्या ठेकेदाराने एकदाच वसुली करायची आहे.

**केशव घरत :-**

परंतु, दोन वेळा करतात.

**सुर्यकांत भोईर :-**

दोन वेळा वसुली केली जाते.

**केशव घरत :-**

आमच्याकडे सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही वेळेला वसुली करतात. आमचा ग्रामीण भाग आहे. त्यामुळे ते भारी पडते.

**गजानन भोईर :-**

जर रू. १५/- ची पावती असेल तर त्या पावतीचे रू. २०/- घेतात.

**केशव घरत :-**

पावतींची वसुली डबल वेळा केली जाते.

**गजानन भोईर :-**

महापालिका रू. २०/- ची पावती घेते. मग ठेकेदारांना ते रू. २०/- ऑफिशियली घेऊ दे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

जर फेरीवाल्यांनी दोन चौरस फुटापेक्षा जास्त जागा व्यापली असेल तर त्याच्यासाठी रू. २०/- घ्यायचे आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपली या विषयावर चर्चा झालेली होती. तेव्हा तुम्ही एक चौरस फुट जागेबाबत बोलत होते. आता तुम्ही दोन चौरस फुट बोलता. परंतु, ती जागा अडीच चौरस फुट आहे. कारण मी 'फेरिवाला क्षेत्र' सांभाळलेले होते. त्यावेळेला माझ्याबरोबर सचिव साहेब होते. आम्ही त्यावेळेला संपूर्ण भाजी मार्केट बंद केलेल होते. त्यावेळेलासुध्दा एक चौरस फुट आणि अडीच चौरस फुटाचा इश्यु होता. त्यावेळेला त्या टेबलवर व्हाईटिंग लावून एक चौरस फुट केलेले होते आणि ती जागा अडीच चौरस फुट जागा होती. जर अडीच चौरस फुट असेल तर ती हातगाडी बरोबर त्या साईजची होते. म्हणून ते अडीच चौरस फुट होते. त्यांनी त्याठिकाणी व्हाईटिंग लावून दोन चौरस फुट केलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

व्हाईटिंग वगैरे काहीही लावलेले नव्हते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी आताची गोष्ट करित नाही. मी त्यावेळेची गोष्ट करित आहे. कारण आता ते कन्टीन्युएशनमध्ये आलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

ठेकेदाराने फळविक्रेते व फेरिवाले यांच्याकडून प्रति चौरस मीटरकरिता बाजार फी रु. १०/- आकारावयाची आहे. एखाद्या फेरिवाल्याने दोन चौरस फुटापेक्षा जास्त जागा व्यापलेली असेल तर अशा फेरिवाले व फळविक्रेते यांच्याकडून रु. २०/- बाजार फी ठेकेदाराने वसुल करायची अशी वर्क ऑर्डर आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हे दोन चौरस मीटर बाबतीत झाले. आता हे दुकानदार पुढच्या बाजुला दुकानाचे सामान मांडतात. त्यांच्याकडूनसुध्दा पैसे कलेक्ट केले जातात. तुम्ही त्याच्यावर काय कार्यवाही करणार आहात? ते सांगा.

**गजानन भोईर :-**

या हातगाडीवाल्यांची गाडी एकीकडे असते आणि गोणी दुसरीकडे असतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी त्याबाबत बोलत नाही. दुकानदारांच्या दुकानासमोर बाकडा लावला किंवा रसवाल्याच्या दुकानासमोर बाकडा लावला तरी त्याच्याकडून पैसे घेतले जातात. तुम्ही त्याच्यावर काय कार्यवाही करणार? ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

ह्याच्यासाठी नं. २०ला अशी तरतुद आहे की, जर बाजारभावाच्या नियमापेक्षा जास्त वसुलीची तक्रार आली तर त्याची शहानिशा करुन रु. १००/- दंड आकारण्यात यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, रु. १००/- म्हणजे काहीच नाही. एका पावतीला रु. १००/- दंड आहे ना.

**विजय पाटील :-**

एका तक्रारीला रु. १००/- दंड आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर त्या माणासाने त्यावेळेला १०० तक्रारी दिल्या तर त्याचे रु. १००/- घेणार का?

**विजय पाटील :-**

आपण तक्रारीची नोंद घेतल्यानंतर त्या तक्रारीचे रु. १००/- घ्यायचे आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला याच्यासाठी १०० पावत्यांची एक तक्रार असे करावे लागेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

एका मॅटरचे रु. १००/- घ्यायचे आहेत.

**जयंत पाटील :-**

एका तक्रारीला रु. १००/- दंड आहे. मग आपण आतापर्यंत असे किती रु. १००/- वसुल केलेले आहेत ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी साहेबांना व्हिडीयो शुटींग आणून दिलेली होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, हे चुकीचे आहे. तुम्ही थोडेसे डिटेलमध्ये जा. नगरपालिका आणि ग्रामपंचायत असताना याचे जे नियम होते तुम्ही ते नियम काढून बघा. त्याच्यामध्ये प्रति चौ.मी. ऐवजी अडीच चौ.मी. असे नमुद केलेले आढळून येईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

चोवीस तासामधून फक्त एकदाच वसुली केली जावी.

**केशव घरत :-**

साहेब, दिवसातुन दोन वेळा वसुली केली जाते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपले वसुलीबाबतचे रुल्स सुंदर आणि सुटसुटीत आहेत.

**जयंत पाटील :-**

साहेब, ही लोक जागा बदलतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

स्पॉट बदलला तर त्याच्यासाठी तरतुद आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडील फेरिवाले सकाळी एकीकडे आणि संध्याकाही दुसरीकडे म्हणजे गोडदेवला वगैरे बसतात. म्हणून त्यांच्याकडून दोनवेळा वसुली केली जाते.

**केशव घरत :-**

एकाच ठिकाणी बसले तर वसुली करणे सोयीस्कर होते.

**सुर्यकांत भोईर :-**

स्पॉट बदलला तर वेगळी गोष्ट आहे.

**गजानन भोईर :-**

तरीसुद्धा रु. २०/- वसुल केले जतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

जे नियमात असेल आपल्याला तेच करावे लागेल.

**गजानन भोईर :-**

परंतु, रु. १५/- घ्यायचे असे नियमात आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण टेंडर काढताना आपले जे धोरण असते आपल्याला तेच धोरण ठेवावे लागते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, तुम्ही कशाच्या आधारावर टेंडर काढलेले होते ते सांगा.

**विजय पाटील :-**

आपण बाजार वसुली करतांना त्या लोकांकडून रु.२०/- ची पावती घेतो. कारण स्थायी समितीच्या सभेमध्ये छपाईसाठी ठराव झालेला होता. त्याच्यासाठी.......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आता एखाद्या ठेकेदाराकडून बाजार वसुली करताना त्यावेळेच्या दरपत्रकाप्रमाणे जे धोरण होते ते बदलता येत नाही.

**गजानन भोईर :-**

त्या माणसाकडे दोन पावत्या आहेत. एक रु.१०/- ची पावती आहे आणि एक रु.१५/- ची पावती आहे. मग आपण त्याच्याकडून सरसकट रु.२०/- ची पावती घेणार का?

**विजय पाटील :-**

आपल्याला सरसकट रु.२०/- घेता येणार नाहीत. आपण रु.१०/-, रु.१५/- आणि रु.२०/- अशाप्रकारे वसुली करणार आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपल्याला कुठलेही धोरण मध्येच बदलता येत नाही. आपण जी वसुली करतो त्याच्यासाठी धोरण ऑलरेडी निश्चित झालेले असते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे धोरण चुकीचे आहे. नगरपालिका असतांना वेगळे धोरण होते आणि आता वेगळे धोरण झालेले आहे. पूर्वी प्रति अडीच चौ. मी. ला रु. ५/- होते.

**रतन पाटील :-**

आता वाढलेले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

आपण ज्या धोरणावर या निवीदा मागविलेल्या आहेत. तुम्ही त्याच्यासाठी येणाऱ्या कालावधीवर विचार विनिमय करण्यासाठी चर्चा करित आहात ना.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्ही येणाऱ्या काळासाठी चर्चा करित आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी तुम्हाला पुन्हा एकदा सांगतो आपले धोरण अडीच चौ. फुटासाठी होते. तुम्ही पुन्हा एकदा बघा.

**प्रेमनाथ पाटील :-**

बाजार वसुलीच्या फी बाबत ग्रामपंचायत आणि नगरपालिकेचे जे ठराव झालेले होते. तुम्ही ते ठराव व्यवस्थित बघा असे सन्मा.सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांचे म्हणणे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्या ठरावाच्या कॉप्या बघा त्याच्यामध्ये अडीच चौ. मी. असल्याचे आढळून येईल आणि आता हे एक चौ. मी. कसे झाले? तुम्ही ज्यावेळेला निविदा मागवलेली होती. तेंव्हा तुम्ही चौ. मी. नमुद करित नाहीत.

**विजय पाटील :-**

आपल्याकडे ज्या निविदा असतात त्याच्या पावत्यांमधील अमाउन्ट धरली जाते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, ती एक चौरस फुटसाठी धरली जात नाही.

**मा.सभापती :-**

तुम्ही चौरस फुटाच्या गोष्टी करु नका. ग्रामपंचायतीच्या काळामध्ये लोकवस्ती कमी होती. परंतु, आता लोकांना रहायला जागा नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता रु.१०/- चे रु. १५/- केले. ते चौरस फुट कसे बदलले? चौरस फुटचे रेट वाढवायला पाहिजे हे बरोबर आहे. परंतु, त्याचे मेजरमेंट का बदलले?

(सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील ह्यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-**

संगणकाचा ठराव आणि बाजार वसुलीचा ठराव हे दोन्ही मंजुर झालेले आहेत.

**प्रकरण क्र. ६७ :-**

सन २००६-०७ करिता बाजार लिलावासाठी आलेल्या निविदांना मंजुरी देणे.

**ठराव क्र. ६९ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका प्रतिवर्षी महानगरपालिका क्षेत्रातील तीन विभागाचे बाजार लिलाव करीत असते. या बाजार लिलावापासून महानगरपालिकेस ठोस उत्पन्न मिळत आलेले आहे. सन २००५-२००६ या वर्षातील बाजार लिलावाची मुदत जून-२००६ या महिन्यामध्ये समाप्त होत असल्याने, महानगरपालिकेने सन २००६-२००७ या वर्षाकरिता बाजार लिलाव करणेकरिता दि.३०/०५/२००६ रोजीचे दैनिक वृत्तपत्र **''सकाळ'' व ''सूरज प्रकाश''** मध्ये जाहीरात देऊन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. या करिता महानगरपालिकेने प्रत्येक विभागाची बारा महिन्याकरिता बाजार फी वसुलीच्या देकाराच्या रक्कमा खालीलप्रमाणे निश्चित केलेल्या आहेत.

| अ.क्र. | विभाग | सन २००५-२००६ या वर्षामध्ये देण्यात आलेला बाजार लिलाव | १०% वाढ घेऊन सन २००५-२००६ या वर्षाकरिता देकाराची निश्चित केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | भाईदर (पुर्व) | रु. ६४,३६,९०९.०० | रु. ७०,८०,५९९/- |
| २ | भाईदर (पश्चिम) | रु. ५७,५०,५००.०० | रु. ६३,२५,५५०/- |
| ३ | मुर्धे ते उत्तन चौक | रु. २,५०,००० | रु. २,७५,०००/- |

वरिलप्रमाणे बाजार फी वसुलीची प्रत्येक विभागाप्रमाणे किमान देकार रक्कम निश्चित करुन वृत्तपत्रात दिलेल्या जाहीरातीप्रमाणे भाईदर (पुर्व), भाईदर (पश्चिम), मुर्धे ते उत्तन या विभागाकरिता ठेकेदारांने निविदा फॉर्म स्विकारुन एकही निविदा मुदतीत महानगरपालिकेकडे सादर केलेली नाही.

तीनही ठेकेदारांनी निविदा फॉर्म महानगरपालिकेकडे मुदतीत सादर न केल्याने दि.१३/०६/२००६ च्या रोजीचे दैनिक वृत्तपत्र ''सकाळ'' व ''सूरज प्रकाश'' मध्ये जाहीरात देऊन फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा प्रसिध्द झाल्यानंतर निविदा धारकाने बाजार निविदा खरेदी करुन भाईदर (पश्चिम), भाईदर (पुर्व) विभागाकरिता एकही निविदा मुदतीत प्राप्त झालेली नाही. फक्त मुर्धे ते उत्तन चौक या विभागाकरिता महानगरपालिक कडे ३ निविदा आलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे...

| अ.क्र. | विभागाचे नांव | प्राप्त निविदा धारकांचे नांव | निविदेत भरलेली रक्कम | महानगरपालिकेने ठरवलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **मुर्धा ते उत्तन** | श्री. नोरीला फन्सेका | २,५०,०००/- | २,७५,०००.०० |
| | | श्री. समीर परेरा | २,७५,०००/- | |
| | | श्रीमती लिलाबाई कलबाटे | २,८०,०००/- | |

वरिल विभागाच्या बाजार फी वसुलीच्या प्राप्त झालेल्या निविदा दि.२२/०६/२००६ रोजी दुपारी १.१५ वाजता उपस्थित निविदाधारक व मा.उपआयुक्त (कर), मा. मुख्य लेखाधिकारी यांच्या समक्ष उघडण्यांत आल्या. या प्राप्त झालेल्या निविदामध्ये श्रीमती लिलाबाई कलबाटे यांची निविदा महानगरपालिकेच्या देकार रक्कमेपेक्षा जास्त (२,८०,०००/-) असल्याने श्रीमती लिलाबाई कलबाटे याची निविदा स्विकारलेली आहे.

दि. १३/०६/२००६ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहीरातीप्रमाणे भाईदर (पश्चिम), भाईदर (पुर्व) या विभागाकरिता एकही निविदा ठेकेदाराकडून प्राप्त न झाल्याने भाईदर (पश्चिम), भाईदर (पुर्व) विभागातील ठेकेदार यांना बाजार निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यत म्हणजेच जुलै-२००६ या एक महिन्याकरिता बाजार वसुलीकरिता मुदत वाढ देण्यांत आलेली आहे. मुदत वाढ देताना सन २००५-२००६ या वर्षातील बाजार लिलावाच्या रक्कमेमध्ये १०% वाढ करुन बाजार लिलावांस एक महिन्याची मुदतवाढ देण्यांत आलेली आहे.

भाईदर (पुर्व), भाईदर (पश्चिम) या विभागातील ठेकेदारानां मुदतवाढ दिल्यानंतर दि. ११/०७/२००६ रोजीच्या **''हमारा महानगर''** या वृत्तपत्रात भाईदर (पुर्व) व भाईदर (पश्चिम) विभागाकरिता अभिकर्ता नेमणेकरिता जाहीरात देण्यात आली. जाहीरात प्रसिध्द झाल्यानंतर दि. १९/०७/२००६ रोजी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशिल

| अ.क्र. | विभाग व देकारांची किमान रक्कम | निविदा धारकांचे नांव व पत्ता | निविदेत नमुद केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | **भाईदर (पुर्व), देकारांची किमान रक्कम रु. ७०,८०,६००/- (अक्षरी रु. सत्तर लाख ऐंशी हजार सहाशे मात्र)** | श्री. अनीस बी. खान<br>२०८, शबनम अपार्टमेंट,<br>बी. पी. रोड, भाईदर (पुर्व), | रु. ८४,१४,३५७/- (अक्षरी रु. चौऱ्याऐंशी लाख चौदा हजार तीनशे सत्तावन्न मात्र) |
| २ | | श्री. राधाकिसन साहेबराव सिरसट<br>सी विंग, १०२, साई दर्शन टॉवर,<br>साईकृपा कॉम्प्लेक्स,<br>काशीमिरा, ठाणे | रु. ८२,११,०००/-(अक्षरी रु. ब्याऐंशी लाख अकरा हजार मात्र) |
| ३ | | श्री. देवानंद जयदेव किणी<br>१०४, एकविरा अपार्टमेट,<br>राममंदिर रोड, भाईदर (पश्चिम) | रु. ७८,०४,३५६/-(अक्षरी रु. अठ्ठयाहत्तर लाख चार हजार तीनशे छप्पन्न मात्र) |
| ४ | | श्री. पॅट्रिक जोजफ रॉड्रीक्स<br>शालू हाउस, दुसरा मजला, गांवदेवी रोड, भाईदर (पश्चिम) | रु. ७२,००,०००/-(अक्षरी रु. ब्याहत्तर लाख मात्र) |
| ५ | | श्री. ललीत राणे<br>४१२, गंधर्वराज, खारीगांव, भाईदर (पुर्व) | रु. ८१,००,०००/-(अक्षरी रु. एक्याऐंशी लाख मात्र) |
| ६ | | श्री. मिलींद एकनाथ डिचवलकर<br>४२/१५३५, गंगाधर को. ऑ. हौ. सो.<br>वर्तक नगर, ठाणे | रु. ७९,०९,९९९/-(अक्षरी रु.एकोणऐंशी लाख नऊ हजार नऊशे नव्वाण्णव मात्र) |

| अ.क्र. | विभाग व देकारांची किमान रक्कम | निविदा धारकांचे नांव व पत्ता | निविदेत नमुद केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| ७ | | श्री. मुकेश मुदन्ना कोटीयन<br>३१, साईभवन,खारीगांव, बी. पी. रोड, भाईदर (पुर्व) | रु. ८१,०७,७७७/-(अक्षरी रु. एक्याऐंशी लाख सात हजार सातशे सत्ताहत्तर |
| ८ | | श्री. राजशेखर शिवगुंडे<br>बी/४०७, पुजा अपार्टमेंट, कैलाशभवन टॉवरच्या समोर, प्लेझेंट पार्क, काशिमिरा- भाईदर रोड, मिरारोड (पुर्व) | रु. ८१,००,८०६/-(अक्षरी रु. एक्याऐंशी लाख आठशे सहा मात्र) |
| ९ | | श्री. दुर्गेश तिवारी<br>३०२, रॉयल पॅलेस, ६० फूट रोड, भाईदर (पश्चिम) | रु. ८१,३९,४५३/- (अक्षरी रु. एक्याऐंशी लाख एकोणचाळीस हजार चारशे त्र्येपन्न मात्र) |
| १० | | श्रीमती ज्योती राजशेखर शिवगुंडे<br>बी/५०४, कैलाशधाम टॉवर, प्लेझेंट पार्क, काशिमिरा- भाईदर रोड, मिरारोड (पुर्व) | रु. ७८,००,८८०/- (अक्षरी रु. अठ्ठयाहत्तर लाख आठशे ऐंशी मात्र) |
| ११ | | श्री. रुपाली तुळशीदास पोळ<br>बी/३०४, कैलाशधाम टॉवर, प्लेझेंट पार्क, काशिमिरा- भाईदर रोड, मिरारोड (पुर्व) | रु. ७७,००,७७७/- (अक्षरी रु. सत्त्याहत्तर लाख सातशे सत्त्याहत्तर मात्र) |
| १२ | | श्री. विशाल रघुनाथ पाटील<br>व्दारकाधीश, बी. पी. रोड, खारीगांव नाका, भाईदर (पुर्व) | रु.७५,१५,२००/- (अक्षरी रु. पंच्याहत्तर लाख पंधरा हजार दोनशे मात्र |
| | | | |
| १ | **भाईदर (पश्चिम) देकारांची किमान रक्कमरु. ६३,२५,५५०/- (अक्षरी रु. त्र्येसष्ट लाख पंचवीस हजार पाचशे पन्नास मात्र)** | श्री. देविदास जयदेव किणी<br>१०२, एकविरा अपार्टमेट, राममंदिर रोड, भाईदर (पश्चिम) | रु.७७,४६,३८७/-(अक्षरी रु. सत्ताहत्तर लाख सेचाळीस हजार तीनशे सत्याऐंशी मात्र) |
| २ | | श्री. रेनॉल्ड रॉड्रीक्स<br>शालू हाउस, दुसरा मजला, गांवदेवी रोड, भाईदर (पश्चिम) | रु.७२,०२,२००/-(अक्षरी रु. ब्याहत्तर लाख दोन हजार दोनशे मात्र) |
| ३ | | श्री. मिलींद एकनाथ डिचवलकर<br>४२/१५३५, गंगाधर को. ऑ. हौ. सो. वर्तक नगर, ठाणे | रु.७२,०२,१९९/-(अक्षरी रु. बाहत्तर लाख दोन हजार एकशे नव्वाण्णव |
| ४ | | श्री. ललीत राणे<br>४१२, गंधर्वराज, खारीगांव, भाईदर (पुर्व) | रु.७१,००,०००/-(अक्षरी रु. एक्याहत्तर लाख मात्र) |
| ५ | | शांता रविराज राठोड<br>बरसाना, ए/६०३, सालासर ब्रजभूमी, टेंभारोड, भाईदर (पश्चिम) | रु.६९,२१,१११/-(अक्षरी रु. एकोणसत्तर लाख एकवीस हजार एकशे अकरा मात्र) |
| ६ | | रविराज राठोड<br>बरसाना, ए/६०३, सालासर ब्रजभूमी कॉम्प्लेक्स, टेंभा रोड, भाईदर (पश्चिम) | रु.६७,२१,७८६ -(अक्षरी रु.सदुसष्ट लाख एकवीस हजार सातशे सहाऐंशी मात्र) |
| ७ | | श्री. पॅट्रिक जोजफ रॉड्रीक्स<br>शालू हाउस, दुसरा मजला, गांवदेवी रोड, भाईदर (पश्चिम) | रु.६४,५०,०००/- (अक्षरी रु.चौसष्ट लाख पन्नास हजार मात्र) |

| अ.क्र. | विभाग व देकारांची किमान रक्कम | निविदा धारकांचे नांव व पत्ता | निविदेत नमुद केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| ८ | | श्री. टोनी सालू रॉड्रीक्स शालू हाउस, दुसरा मजला, गांवदेवी रोड, भाईदर (पश्चिम) | रु. ६३,५०,०००/- (अक्षरी रु. त्र्येसष्ट लाख पन्नास हजार मात्र) |

वरिल विभागाप्रमाणे बाजार फी वसुली बाबतच्या प्राप्त झालेल्या निविदा दि. १९/०७/२००६ रोजी सांयकाळी ठीक ५.०० वाजता उपस्थित निविदा धारक व मा. उपआयुक्त सो., (मुख्यालय), मा. लेखा परिक्षक, मा. नगर सचिव यांच्या समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तपशिल वरिलप्रमाणे आहे.

**भाईदर (पुर्व)** विभागातील बाजार फी वसुली बाबत महानगरपालिकेची किमान देकाराची रक्कम रु. ७०,८०,६००/- इतकी आहे. प्राप्त झालेल्या निविदा धारकांपैकी अनीस डी. खान यांची निविदा सर्वात जास्त रक्कमेची रु.८४,१४,३५७/- ही निविदा स्विकारलेली आहे.

**भाईदर (पश्चिम)** विभागातील बाजार फी वसुली बाबत महानगरपालिकेची किमान देकाराची रक्कम रु. ६३,२५,५५०/- इतकी आहे. प्राप्त झालेल्या निविदा धारकांपैकी देविदास जयदेव किणी यांची निविदा सर्वात जास्त रक्कमेची निविदा स्विकारलेली आहे.

भाईदर (पश्चिम), भाईदर (पुर्व) बाजार वसुलीकरिता श्री. अनीस डी. खान (भाईदर (पुर्व)) व श्री. देविदास जयदेव किणी, भाईदर (पश्चिम), या ठेकेदारांस दि. ०१/०८/२००६ ते ३१/०७/२००७ पर्यत, श्रीमती लिलाबाई कलबाटे (मुर्धे ते उत्तन) या विभागाकरिता दि. ०१/०७/२००६ ते ३०/०६/२००७ पर्यत या ठेकेदारांना सन २००६-२००७ या वर्षाकरिता बाजार वसुली ठेका त्यांनी निविदेमध्ये सादर केलेल्या देय रक्कमेप्रमाणे देण्यास मा. स्थायी समितीची मंजुरी आहे. भाईदर (पुर्व) भाईदर (पश्चिम) बाजार लिलाव धारक यांना दिलेल्या जुलै-२००७ या महिन्याच्या मुदत वाढीस मा. स्थायी समितीची मंजुरी असे, तसेच बाजार लिलाव वसुली ठेकेदारांनी महानगरपालिकेने केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे करणेस मंजुरी आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६८ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, या ठरावाप्रमाणे रु.२०/- ची पावती पुस्तके छपाईला मंजुरी नसुन रु.१५/- ची पावती पुस्तके छपाईला मंजुरी असेल.

**रतन पाटील :-**

रु. २०/- ची पावती पुस्तके छपाईला मंजुरी दिलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण बाजार वसुलीची रु.१५/- च्या पावती पुस्तक छपाईला मंजुरी दिलेली आहे ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

रु. २०/- च्या पावती पुस्तकाला मंजुरी दिलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

रु. २०/- कोणी केले?

**मा. सभापती :-**

आपल्याला अमाउन्ट बदली करता येत नाही. कारण हा महासभेचा विषय आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

रु.१०/- आणि रु. १५/- च्या पावती पुस्तकाला मंजुरी द्यायची आहे ना?

**ज्युडी डीसोजा :-**

रु. १०/- आणि रु.१५/- चे पावती पुस्तक छापायचे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

रु.१०/- आणि रु.१५/- असे पावती पुस्तक छापायचे आहे. शिवाय, आता सन्मा.सदस्य गजानन भोईर बोलले की रु.२०/- घ्या आणि रु.२०/- ची पावती फाडायला सांगा. तर तुम्ही बोलले की ते आमच्या अटीशर्तीमध्ये नमुद केलेले नाही.

**विजय पाटील :-**

अटीशर्तीमध्ये रु.२०/- घेण्याचे नमुद केलेले आहे. परंतु, पावती छपाईसाठी ठराव......

**गजानन भोईर :-**

तसे पाहिले तर बाजार वसुली करताना रु. २०/- घेतात आणि त्याच्यामुळे बोंबाबोंब होते. त्याच्यापेक्षा ऑफिशिअली रु. २०/- घेणे योग्य आहे.

**मा. सभापती :-**

कायद्याने रु. २०/- द्यायचे बंधनकारक केले तर ते रु. २०/- देतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

जिथे रु. २०/- घ्यायला पाहिजे. तिथे ती लोक रु. २५/- घेतात

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

परंतु, रु. २०/- कुठे घ्यायला पाहिजेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

जिथे जास्त एरिया आहे तिथे रु. २०/- घ्यायला पाहिजे.

**विजय पाटील :-**

आपल्याला पावती छपाईसाठीचासुद्धा विचार करावा लागणार आहे

**गजानन भोईर :-**

आपण त्यांना पावती छापून देणार आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

तुम्ही तुमचा एरिया नोटीफाय केलेला आहे. जर तुंम्हाला तो एरिया मोठा वाटला तर तुंम्हाला त्यांच्या सर्व्हेक्षणाप्रमाणे रु. २०/- ची पावती द्यावी लागेल.

**मा. सभापती :-**

साहेब, तसे करु नका. घोटाळा होईल. ती लोक आडीबाजी करुन पैसे परत मागतील. मग आपण त्यांना खत घातल्यासारखे होईल आणि ती लोक ऐकणारसुद्धा नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

सरसकट रु. २०/- प्रमाणे वसुली करावी असे सभापती साहेबांचे म्हणणे आहे.

**गजानन भोईर :-**

आपण प्रत्येक वेळेला जागेचे मेजरमेंट करण्यासाठी टेप घेउन जाउ शकत नाही.

**प्रकरण क्र. ६८ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. ७० :-**

महापालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी आवयक औषधे पुरवठा करणेकामी निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळून मे सागर एन्टप्रायझेस, झेनिथ मार्केटिग सर्विस, शाह फार्मा, भैंरव मेडीकल ॲन्ड जनरल स्टोर्स, विहार मेडीकल ॲन्ड जनरल स्टोर्स, या निविदाकारांनी निविदा भरल्या होत्या. त्यांनी निविदेत खालील प्रमाणे दर सादर केले आहेत.

| Sr. No. | Description | SAGAR ENTERPRISES | | | ZENITH MARKETING SERVICE | | | SHAH PHARMA | | | BHAIRAV MEDICAL & GENERAL STORES | | | VIHAR CHEMIST & GENERAL STORES | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Packing | Rate | Mfg by | Packing | Rate | Mfg by | Packing | Rate | Mfg by | Packing | Rate | Mfg by | Packing | Rate | Mfg by |
| 1 | Cap. Doxycycline 100 mg. | 1 x 10 | 27.9 | Indswift /Gearman Remedies | 1 x 10 | 33 | Intas | 1 x 10 | 30 | Omega / SGS | 1 x 10 | 29 | Cipla | 1 x 10 | 28 | Omega |
| 2 | Cough Expectorant without Bronchodialator 4.5 Lit. Jar | 1 x 4.5 Lit. | 165 | Ciron | 1 x 4.5 Lit. | 160 | Ciron | 1 x 4.5 Lit. | 150 | Sherly /esgeet | 1 x 4.5 Lit. | 166 | Ciron | 1 x 4.5 Lit. | 163 | Sherly |
| 3 | Tab. Multi Vitamin | 1 x 10 | 49.5 | Indswift / Leaker | 1 x 10 | 52 | Cipla | 1 x 10 | 53 | Ranbaxy | 1 x 10 | 55 | Lupin | 1 x 10 | 53 | Indswift |
| 4 | Tab. Metronidazole 400 mg. | 1 x 10 | 9 | Cadila | 1 x 10 | 8.95 | Ranbaxy | 1 x 10 | 8.1 | Omega / SGS | 1 x 10 | 9.1 | Lupin | 1 x 10 | 9 | Ranbaxy |
| 5 | Cream Beclomethazone + Neomycin | 1 x 15 gm. | 21 | Micro Lab | 1 x 15 gm. | 22 | Lupin | 1 x 15 gm. | 20 | SGS / Avni | 1 x 15 gm. | 22 | Cipla | 1 x 15 gm. | 22 | Avni |
| 6 | Cream Beclomethazone + Cotrimazole | 1 x 15 gm. | 24 | Micro Lab | 1 x 15 gm. | 24 | Indswift | 1 x 15 gm. | 23 | SGS / Avni | 1 x 15 gm. | 23 | Cipla | 1 x 15 gm. | 23 | Indswift |
| 7 | Glibenclamide 5 | 1 x 10 | 5 | Sanket | 1 x 10 | 6 | Omega | 1 x 10 | 4.3 | Sanket | 1 x 10 | 7 | Bipul | 1 x 10 | 5 | Sanket |
| 8 | Antacid | 1 x 9 | 7.25 | Ranbaxy | 1 x 9 | 8 | Ranbaxy | 1 x 9 | 7 | Cipla / Arco | 1 x 9 | 8.5 | Cadila | 1 x 9 | 8 | Cipla |

वरील तक्त्याचे अवलोकन करता मे. सागर एन्टरप्रायझेस यांनी औषध पुरवठा करणेकामी बाब क्र. १ व ३ तसेच मे. शहा फार्मा यांनी बाब क्र. २,४,५,६,७,८ साठी सादर केलेले दर सर्वात कमी आहे. व बाजार भावाशी तुलना करता योग्य आहेत. मा. आयुक्त यांनी मे. सागर एन्टरप्रायझेस व शाह फार्मा यांनी सादर केलेली निवीदेतील दर मंजुर केले आहे. तसेच याकामी येणाऱ्या रू. ९९६२५३/- खर्चास मंजुरी दिलेली आहे.

सदर प्रस्तावाचे स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, अतिक्रमण विभागाचे अधिकारी कुठे आहेत?

**केशव घरत :-**

साहेब, अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब चक्कीबाबत माहिती द्या.

**केशव घरत :-**

पाणीपुरवठ्याबाबतचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे तुम्ही श्री. शिवाजी बारकुंडसाहेबांना बोलावले तर बरे होईल.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही संजय तायशेट्ये यांनासुद्धा बोलवा.

**केशव घरत :-**

मी तुम्हाला एका विषयाची माहिती देतो की आज घोडबंदरची टाकी पडून दिड ते दोन महिने झालेले आहेत. परंतू, अजुनपर्यंत काम सुरू झालेले नाही. पाण्याच्या टाकीचे काम कधी पुर्ण होणार आहे? ते सांगा.

**मा. सभापती :-**

आता जे आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्या सदस्यांनी स्थायी समितीला चांगल्याप्रकारे सहकार्य केलेले आहे. या शहराच्या विकासामध्ये भर पडली. शहराचा विकास करतांना ज्या काही अडचणी होत्या आपण त्या अडचणी सुधारुन घेतलेल्या आहेत. तुम्ही तुमची कारकिर्द गेले अकरा महिने चांगल्या पद्धतीने पार पडल्याबद्दल आणि आपण प्रशासनाला नेहमी सहकार्य करित असतो. यापुढेसुद्धा सहकार्य कराल अशी अपेक्षा बाळगतो. प्रशासनाने नगरसेवकांच्या प्रश्नाबाबत संबंधित अधिकाऱ्यांना बोलाउन त्यांच्यावर तोडगा काढला पाहिजे. कारण आपण थोडे सैल सोडल्यामुळे काही लोक त्याचा गैरफायदा घेतात. असे होता कामा नये. तुम्ही आतापर्यंत दिलेल्या सहकार्याबाबत धन्यवाद देतो. आणि नविन सदस्यांना हार्दिक शुभेच्छा देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपले जे आठ सदस्य निवृत्त होणार आहेत त्यांनी नविन सदस्यांना खुप काही शिकवलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मी नगरपालिका आणि महापालिकेत काम केलेले आहे. माझा त्याबाबत असा अनुभव आहे की आपल्या जेवढ्या स्थायी समितीमध्ये चर्चा होतात आणि तिथे जेवढे नॉलेज मिळते ते महासभेत मिळत नाही. कारण महासभेत मोठे प्रेझेंटेशन असते. महासभेत मोठे व्यासपीठ असते. त्यामुळे आपण इथे जेवढे एकमेकांचे विचार समजून घेउ शकतो. आपण ते विचार महासभेत समजावून घेउ शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहब, आंम्हाला ह्या सदस्यांनी जी शिकवण दिलेली आहे ती शिकवण नक्कीच उपयोगी पडेल. आणि ह्यांची पोकळी न भरुन काढण्यासारखी आहे. आता आपले अभ्यासू नगरसेवक निवृत्त होत आहेत. आमच्यावरसुद्धा ती जबाबदारी पडलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

स्थानिक स्वराज्य संस्थेचा असा पहिला पाया आहे की लोकप्रतिनिधीला शासन प्रणालीची जाण व्हावी आणि त्याच्यामधून उपजत नेतृत्त्व तयार व्हावे. हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा मुळ उद्देश आहे.

**रतन पाटील :-**

या अकरा महिन्याच्या कालावधीमध्ये आमचे आठ सदस्य निवृत्त होत आहेत. आंम्हाला त्यांनी स्थायी समितीमध्ये खुप सहकार्य केलेले आहे.

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग यांचे हार्दिक आभार मानुन आजची सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ४.४५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**